पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक १४ • सोमवार, दि. २० जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

कारण सांगणारी लोकं यशस्वी होत नाहीत आणि, यशस्वी होणारे लोक कारण सांगत नाहीत




## »थोडक्यात

### लोकसभेत गोंधळ

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटी प्रकरणी चर्चा करण्यात यावी, असी मागणी विरोधकांनी सभागृहात केली. मात्र, लोकसभा अध्यक्ष बिर्ला यांनी याला कोणतेच उत्तर न दिल्याने अखेर विरोधकांनी सभागृहात घोषणाबाजी सुरू केली. ज्यानंतर ओम बिर्ला यांनी सुरू झालेले कामकाज अवघ्या २० मिनिटांमध्ये बंद करत १२ वाजल्यापासून कामकाजाला पुन्हा सुरुवात होईल, अशी घोषणा केली. यावेळी विरोधकांमधील खासदार वेलच्या दिशेने पुढे येत घोषणाबाजी करताना पाहायला मिळाले. कामकाजाच्या सुरुवातील लोकसभा अध्यक्षांनी प्रश्नोत्तराची घोषणा करत सत्ताधारी सदस्यांमधून प्रश्नोत्तराला सुरुवात केली. विरोधकांनी नीट पेपरफुटी, राम मंदिरातील दान पेट्यांमधील कथित चोरी व इतर मुद्द्यांवरून आक्रमक पवित्रा घेत गोंधळ घातला.

### बहुमताने मंजूर होणार

**छत्रपती संभाजीनगर:** डिलिमिटेशन विधेयकावरून विरोधकांमध्ये मतभेद सुरू असतानाच राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे. हे विधेयक लोकसभेत बहुमताने मंजूर होईल आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या भूमिकेनुसार निर्णय घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीचार्जचे समर्थन करता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर पत्रकारांशी बोलताना शिरसाट यांनी विविध राजकीय मुद्द्यांवर भूमिका मांडली.

### चीनमध्ये मोठा अपघात

**चोंगोइंग:** शहरात दरड कोसळल्यामुळे ढिगाऱ्याखाली गाडले गेलेल्या ३४ जणांचा सोध घेण्याचे काम अजूनही अव्याहतपणे सुरू आहे. चीनच्या नैऋत्येकडील चोंगोइंग शहरात दरड कोसळल्यामुळे ढिगाऱ्याखाली गाडले गेलेल्या ३४ जणांचा सोध घेण्याचे काम अजूनही अव्याहतपणे सुरू आहे. दरड कोसळल्यामुळे किमान ८ जण ठार झाले आहेत. शुक्रवारी सकाळी पेंगशुइ कौंटीतील डोंगरपायथ्याशी असलेल्या रहिवासी इमारतींवर विशाल दरड आणि डोंगराची माती कोसळली होती. ही दरड कोसळल्यानंतर या भागातील डोंगरपायथ्याजवळच्या एक किलोमीटर परिघातील सर्व २१ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. येथील १,१०० रहिवाशांना दुसरीकडे स्थलांतरित करण्यात आले आहे. जखमी झालेल्या १० पैकी एकाला रुग्णालयातून सोडले आहे. तर इतर ९ जणांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येते आहे. ढिगाऱ्याखालून बाहेर काढलेले ८ जण मरण पावले असल्याचे आढळून आले होते.

# आंदोलकांवर लाठीमार!

प्रतिनिधी | २० जुलै

**दिल्ली :** दिल्लीत संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होताच जंतरमंतरवर पोलीस आणि सुरक्षा दलांनी आक्रमक स्वरुप धारण केले आहे. कॉकरोच जनता पार्टीने आज संसदेवर मोर्चा काढण्याची हाक दिली होती. मात्र, दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना जंतरमंतरपासून केवळ एक किलोमीटर अंतरावर असलेल्या केरळ भवनापर्यंत मोर्चा काढण्याची परवानगी दिली होती. यावरुन दिल्ली पोलीस आणि आंदोलकांमध्ये वाद झाला. त्यामुळे शीघ्र कृती दलाच्या जवानांनी आंदोलकांवर लाठीमार केला. दिल्ली पोलीस आणि शीघ्र कृती दलाचे जवान आंदोलकांना झोडपत असल्याचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

आजपासून दिल्लीत संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. एकीकडे संसदेत कामकाजाला सुरुवात होताच आंदोलक त्याठिकाणी जाण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यामुळे पोलिसांकडून लाठीमार करण्यात आल्याचे सांगितले जाते. कालपासूनच जंतरमंतरच्या परिसरात सुरक्षा दलांनी वज्र वाहन, वॉटर कॅनन आणि मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

आंदोलकांवर लाठीमार करण्यात आल्यानंतर परिसरात तणाव निर्माण झाला आहे. त्यामुळे या परिसरातील इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली आहे. तसेच दिल्ली परिसरात मोबाईल जॅमर्सची संख्याही वाढवण्यात आली आहे. दरम्यान, संसदेच्या कामकाजाला सुरुवात होताच विरोधकांनी सभागृहात नीट परीक्षा पेपरफुटीवरुन चर्चेची मागणी केली.

मात्र, लोकसभा अध्यक्षांनी ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे विरोधकांनी संसदेत गोंधळ घातला.

यामुळे लोकसभा अध्यक्षांनी लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केली आहे. एकीकडे पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीमार करण्यात आला असला तरी दुसरीकडे मागच्या दाराने सरकारने कॉक्रोच जनता पार्टी आणि सोनम वांगचूक यांच्याशी चर्चा सुरु केल्याची माहिती आहे. सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांना आयुक्तांच्या कार्यालयात नेण्यात आले आहे. सरकारचे काही प्रतिनिधी वांगचूक यांच्याशी रुग्णालयात जाऊन चर्चा करण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढे काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.






### सुरक्षारक्षक बंदुकी घेऊन तैनात


आंदोलकांनी घुसखोरी केल्यास त्यांना रोखायला बंदुकी घेऊन सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. संसद भवनातील सुरक्षारक्षकांनी सीजेपीचे काही आंदोलक जवळ आल्याचे समजताच धावत जाऊन संसद मार्गावरील गेट बंद केले. त्यानंतर काही सुरक्षारक्षक या गेटच्या दिशेने बंदुका रोखून तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय, आंदोलकावर पाण्याचा मारा करण्यासाठी मोठे पाईप्सही याठिकाणी आणण्यात आले आहेत. दरम्यान, हे आंदोलक संसदेच्या गेटपर्यंत पोहोचू नये, यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या आहेत. त्यामुळे सध्या संसदेच्या परिसरात मोठी धावपळ पाहायला मिळत आहे. अभिजीत दिपके यांनी आज संसदेवर धडकण्याचा इशारा दिला होता. मात्र, पोलिसांनी सगळ्या आंदोलकांना जंतरमंतरवरुन बाहेर पडून दिले नाही. परंतु, या सगळ्या सुरक्षा यंत्रणांना चकवून एक गट संसदेच्या परिसरात पोहोचल्याने एकच गोंधळ उडाला आहे.

# भीषण अपघात 6 जणांचा मृत्यू!

प्रतिनिधी | २० जुलै

**वर्धा:** समृद्धी महामार्गावर वर्ध्यातील विरूळ गावाजवळ पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात झाला आहे. या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. नागपूरकडे जाणाऱ्या एका कारला मागून भरधाव येणाऱ्या मालवाहू वाहनाने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की, अपघात होताच कारने अचानक पेट घेतला आणि आगीच्या मोठ्या ज्वाळा उसळल्या. या दुर्घटनेत कारमधील चार जणांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही आणि ते आतच जिवंत होरपळले. तर धडक देणाऱ्या मालवाहू वाहनातील दोन व्यक्तींचांही मृत्यू झाला असून, अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे.

या भीषण अपघातात एकूण सहा जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये आयशर ट्रकचा चालक संजय कुमार (३०, उत्तर प्रदेश), वाहक समरजित पाल (२४, उत्तर प्रदेश) यांच्यासह कारमधील जानवी राजेश टिपले (२१), सुषमा राजेश टिपले, राजेश आनंदराव टिपले आणि अंकुश राऊत (सर्व रा. सालोड हिरापूर, जि. वर्धा) यांचा समावेश आहे. अपघातानंतर सर्व मृतदेह महामार्गावरील रुग्णवाहिकेच्या



मदतीने वर्धा जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून, या दुर्घटनेमुळे वर्धा जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या अपघाताचे मूळ कारण काल रात्री घडलेल्या एका दुसऱ्या घटनेत आहे. याच मार्गावर रात्रीच्या सुमारास इथेनॉल वाहून नेणारा एक टँकर पलटी झाला होता. त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून महामार्गाची एक बाजू बंद करून दुसऱ्या बाजूने एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली होती. याच एकेरी मार्गावरून वाहतूक सुरू असताना, पहाटेच्या सुमारास विरूळ गावाजवळ एका मालवाहू वाहनाच्या चालकाचे स्वतःच्या वाहनावरील नियंत्रण सुटले. हे अनियंत्रित वाहन थेट समोरून चाललेल्या कारवर जाऊन जोरदार आदळले आणि त्यानंतर हा मृत्यूचा तांडव घडला.

# बनावट गुटखा फॅक्टरी प्रकरणात 'मकोका' लावा !

## » अन्न व औषध प्रशासनाचे पोलिसांना पत्र

प्रतिनिधी | २० जुलै

**अकोला :** संपूर्ण महाराष्ट्रात खळबळबळ उडवून देणाऱ्या अकोल्यातील बनावट गुटखा निर्मिती फॅक्टरीचा अखेर भंडाफोड झाला. 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने या प्रकरणातील अनेक कच्चे दूवे चव्हाट्यावर आणल्यानंतर आता या बातमीचा मोठा 'इम्पॅक्ट' पाहायला मिळत आहे.

अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणात थेट 'मकोका' लावण्याची अधिकृत मागणी केली आहे. सह आयुक्त देवानंद वीर यांनी 'सिटी न्यूज सुपरफास्ट'शी बोलताना स्पष्ट केले की, दोन्ही प्रकरणांतील एफआयआर नोंदवणाऱ्या अधिकाऱ्यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनला मकोका लावण्याबाबतचे पत्र दिले आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या या भूमिकेनंतर अकोला पोलिस काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



राज्याचे एफडीए आयुक्त मुंडे यांनी १२ जून २०२६ पासूनच गुटखा निर्मिती, वितरण आणि तस्करांविरोधात मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे थेट निर्देश दिले होते. असे असतानाही, अकोल्याचे एमआयडीसी पोलीस या बनावट गुटखा फॅक्टरी प्रकरणात मकोका लावण्यास टाळाटाळ का करत आहेत ? हा सर्वात मोठा अनुत्तरीत प्रश्न आहे. या गंभीर विषयावर अकोल्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांची मात्र अद्याप कोणतीही प्रतिक्रिया प्राप्त झालेली नाही.

### गौरव शर्मा पाताळात लपला की लपवला ?

गुटखा निर्मिती, साठवणूक आणि वितरण अशा संपूर्ण 'सिंडिकेट'चा पर्दाफाश झालेला असताना, या संपूर्ण काळ्या साम्राज्याचा मुख्य सुत्रधार गौरव शर्मा अद्याप फरार आहे. तो स्वतः पाताळात लपला आहे की त्याला यंत्रणेनेच लपवले आहे ? असा संतप्त सवाल आता अकोलेकर विचारत आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या अत्यंत विश्वसनीय माहितीनुसार, 'दादाराव' नावाच्या एका पांढरपेशा व्यक्तीच्या दबावामुळे आणि मध्यस्थीमुळे अकोला पोलिसांनी या प्रकरणात अत्यंत मवाळ भूमिका घेतली आहे. या बनावट गुटखा फॅक्टरीमध्ये अकोल्यातील कोणाचे पैसे गुंतले आहेत, याचा तपास पोलीस का करत नाहीत ? अशी विचारणा सुरु झाली आहे.

### दोनच अधिकारी, तरीही १४ कारवाया

अन्न व औषध प्रशासनाकडे केवळ २ अधिकारी कार्यरत असताना, त्यांनी १ एप्रिल २०२६ पासून आतापर्यंत तब्बल १४ मोठ्या कारवाया करून गुटखा माफियांचे कंबरडे मोडले आहे. एफडीए आपली जबाबदारी चोख पार पाडत असताना, अकोला पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा मात्र सुस्त का आहे? मकोकासाठी अत्यंत 'फिट केस' असतानाही गुन्हे नोंदवण्यास होणारी दिरंगाई संशयाच्या भोवऱ्यात आहे. कोट्यवधींचे गुटखा प्रकरण दाबण्यासाठी वेगाने हालचाली सुरू आहेत. हे प्रकरण पूर्णपणे गुंडाळले जाणार का ?अशी भिती अकोलेकरांमध्ये आहे.

### अधिवेशन ऐतिहासिक ठरणार- पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होण्यापूर्वी आज सोमवारी (२० जुलै) प्रसारमाध्यमांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे अधिवेशन अत्यंत ऐतिहासिक ठरणार असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकासह देशाने विविध क्षेत्रांत मिळवलेल्या यशाचा विशेष उल्लेख केला. तसेच, या अधिवेशनात केंद्र सरकार अनेक महत्त्वाची विधेयके मांडणार असून, त्यात 'वंदे मातरम'शी संबंधित विधेयकाचाही समावेश आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'माझा असा ठाम विश्वास आहे की, जिथे तथ्य आणि तर्क असतात, तिथे गोंधळ किंवा वादळाला काहीही वाव नसतो.' 'देशाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन असणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या सभागृहात अत्यंत अनुभवी खासदार आहेत. राजकीय पक्ष कोणताही असो, त्यांच्याकडे प्रचंड अनुभव आहे. अशा वेळी संसद आणि देश या दोघांनाही त्यांच्या या अनुभवाची आणि ज्ञानाची गरज आहे.




### स्पेनने १६ वर्षांनंतर फुटबॉल विश्वचषक जिंकला

**न्यूयॉर्क:** स्पेनने १६ वर्षांनंतर फुटबॉल विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले. न्यूयॉर्कमधील न्यू जर्सी स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात संघाने २०२२ च्या चॅम्पियन अर्जेंटिनाला १-० ने हरवले. स्पेनसाठी अतिरिक्त वेळेत फेरन टोरेसने गोल केला. यासोबतच स्पेनने २०१० नंतर दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली. तेव्हा संघाने नेदरलँड्सला १-० ने हरवले होते. हा सामना ९० मिनिटांपर्यंत बरोबरीत राहिला. त्याचे सर्वात मोठे कारण अर्जेंटिनाचे गोलकीपर एमिलियानो मार्टिनेज होता. स्पेनने संपूर्ण सामन्यात सतत हल्ला चढवला. कधी लामिन यमालने बॉक्सबाहेरून शॉट मारला, कधी ओयारजाबालने संधी निर्माण केली, तर कधी पेड्री आणि निको विल्यम्स गोलजवळ पोहोचले.








# लिंगभाव आणि स्त्री अभ्यास :समताधिष्ठित, संविधाननिष्ठ आणि मानवतावादी भारत घडविण्याचा प्रभावी मार्ग

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची हमी दिली आहे. महात्मा जोतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी शिक्षण, विवेक, समता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या माध्यमातून न्याय्य समाजरचनेचे स्वप्न मांडले. आजही त्यांच्या विचारांची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात आपण पुढे जात असलो तरी समाजात स्त्री-पुरुष असमानता, कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार, बालविवाह, हुंडा, स्त्रीभ्रूणहत्या, पारलिंगी व्यक्तींविरुद्ध भेदभाव, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांसारखी अनेक आव्हाने कायम आहेत. या प्रश्नांचे निराकरण केवळ कायदे करून शक्य नाही; त्यासाठी संवेदनशील, अभ्यासू आणि संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवणारे नागरिक घडविणे आवश्यक आहे. 'लिंगभाव व स्त्री अभ्यास' (Gender & Women's Studies) हा अभ्यासक्रम हीच भूमिका प्रभावीपणे पार पाडतो.

मी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून एम.ए. स्त्री व लिंगभाव अभ्यास पूर्ण केला. सामाजिक कार्य करताना अनेक प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभव आला होता; परंतु या अभ्यासक्रमामुळे त्या प्रश्नांच्या मुळाशी जाण्याची, त्यांचे शास्त्रीय विश्लेषण करण्याची आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने उपाय शोधण्याची नवी दृष्टी मिळाली. त्यामुळे हा अभ्यासक्रम माझ्यासाठी केवळ शैक्षणिक पदवी नसून सामाजिक बांधिलकी अधिक सक्षम करणारा जीवनानुभव ठरला.

## "मी समाजाची प्रगती स्त्रियांनी मिळविलेल्या प्रगतीच्या प्रमाणावर मोजतो." – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**लिंगभाव आणि स्त्री अभ्यास म्हणजे काय?**

हा अभ्यासक्रम केवळ महिलांच्या प्रश्नांचा अभ्यास करणारा नाही. स्त्री, पुरुष आणि सर्व लिंग-ओळख असलेल्या व्यक्तींना समान सन्मान, समान संधी आणि न्याय मिळावा, यासाठी समाजव्यवस्थेचे आंतरविद्याशाखीय विश्लेषण करणारी ही ज्ञानशाखा आहे. समाजातील सत्ता-संबंध, संस्कृती, शिक्षण, धर्म, अर्थकारण, माध्यमे, कायदे आणि सार्वजनिक धोरणांचा लिंगभावाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करून समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न या अभ्यासक्रमातून केला जातो.

**अभ्यासक्रमाचे सामाजिक महत्त्व**

या अभ्यासक्रमात लिंगभाव, पितृसत्ता, स्त्रीवाद, पुरुषत्व, मानवी हक्क, भारतीय राज्यघटना, सामाजिक न्याय, संशोधन पद्धती, महिला सक्षमीकरण, पारलिंगी व्यक्तींचे अधिकार, सार्वजनिक धोरणे, नेतृत्व विकास आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा सखोल अभ्यास केला जातो. यामुळे विद्यार्थी केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर समाज समजून घेण्यासाठी तयार होतात. चिकित्सक विचार, संवेदनशीलता, संवादकौशल्य, संशोधनाची क्षमता आणि लोकशाही मूल्यांप्रती बांधिलकी होते.

**सामाजिक कार्यात या शिक्षणाची उपयुक्तता**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा जिल्हाकार्याध्यक्ष म्हणून कार्य करताना वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय यांचा प्रसार करण्याचे कार्य मी करीत आहे. या प्रत्येक उपक्रमात लिंगभाव व स्त्री अभ्यासातून मिळालेले ज्ञान माझ्यासाठी दिशा देणारे ठरले आहे.

आज समाजाला संघर्ष करणारे कार्यकर्ते जितके आवश्यक आहेत, तितकेच अभ्यासू, संवेदनशील आणि धोरणात्मक विचार करणारे कार्यकर्तेही आवश्यक आहेत. हा अभ्यासक्रम अशीच पिढी घडवितो.

**रोजगार आणि करिअरच्या संधी**

महिला व बालविकास, सामाजिक न्याय, आरोग्य, शिक्षण, संशोधन, स्वयंसेवी संस्था, CSR, समुपदेशन, प्रशिक्षण, महिला आयोग, बालहक्क आयोग, संशोधन संस्था, विद्यापीठे आणि विविध विकास प्रकल्पांमध्ये या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. बदलत्या काळात GENDER EXPERT, GENDER TRAINER, RESEARCH ASSOCIATE, PROGRAMME OFFICER, SOCIAL DEVELOPMENT CONSULTANT यांसारख्या पदांची मागणी वाढत आहे.

**शासनासाठी काही ठोस सूचना**

महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने शासनाने पुढील बाबींचा गांभीर्याने विचार करावा—

१. महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि महिला आयोगातील संबंधित पदांवर 'लिंगभाव व स्त्री अभ्यास' पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे.

२. महिला सक्षमीकरण, मिशन शक्ती, सखी केंद्रे, वन स्टॉप सेंटर, समुपदेशन सेवा आणि लिंगसमता प्रकल्पांमध्ये या अभ्यासक्रमाच्या पदवीधरांसाठी स्वतंत्र पदनिर्मिती करावी.

३. विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये ' लिंगभाव व स्त्री अभ्यास' या विषयाविषयी करिअर मार्गदर्शन व जनजागृती अभियान राबवावे.

शासकीय व निमशासकीय प्रशिक्षण संस्थांमध्ये लिंगसंवेदनशीलता प्रशिक्षणासाठी या विषयातील तज्ज्ञांचा समावेश करावा.,महिला सक्षमीकरणाशी संबंधित धोरणे, संशोधन आणि प्रकल्पांमध्ये या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना संशोधन व इंटर्नशिपच्या अधिक संधी उपलब्ध करून द्याव्यात.

समताधिष्ठित समाज केवळ कायद्याने निर्माण होत नाही; तो शिक्षण, संवेदनशीलता आणि विवेकपूर्ण विचारातून घडतो. लिंगभाव व स्त्री अभ्यास हा अभ्यासक्रम समाजाला अशीच परिवर्तनवादी दृष्टी देतो. त्यामुळे हा अभ्यासक्रम केवळ शैक्षणिक पदवी नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. माझी महाराष्ट्र शासन, विद्यापीठे, महाविद्यालये, शिक्षक, विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांना, संस्था, संघटना यांना नम्र विनंती आहे की, या अभ्यासक्रमाचा अधिक व्यापक प्रचार-प्रसार करावा.

विशेषतः महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, संशोधन, प्रशिक्षण आणि धोरणनिर्मितीच्या क्षेत्रात " लिंगभाव व स्त्री अभ्यास" पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. असे झाल्यास शासनाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होईल आणि समताधिष्ठित, संविधाननिष्ठ व मानवतावादी भारत घडविण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले जाईल.



**प्रफुल्ल मंदा श्रीधर**
जिल्हाकार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महा. अंनिस), अमरावती मो. नं. 9665185428

# देशाच्या सत्ताधाऱ्यांना एक गंभीर आवाहन आणि हात जोडून विनंती– जनतेचा आवाज ऐका

आज देश अशा वळणावर उभा आहे की सर्वसामान्य नागरिकाला स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य असूनही त्याचा आवाज ऐकला जात नाही, अशी भावना समाजात वाढत आहे. शिक्षण, पैसा, सत्ता आणि संपत्ती असलेल्या लोकांचे मत अधिक महत्त्वाचे मानले जाते, तर गरीब, शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी आणि कष्टकरी वर्ग दुर्लक्षित राहतो. ही परिस्थिती लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे.

अलीकडेच शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी उपोषण करणाऱ्या एका व्यक्तीचे आंदोलन संपविण्यात आले. कोणतेही आंदोलन योग्य की अयोग्य याचा निर्णय कायद्याच्या चौकटीत होऊ शकतो; परंतु विद्यार्थ्यांचे, बेरोजगारांचे आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न ऐकले जाणे हे कोणत्याही लोकशाही सरकारचे कर्तव्य आहे. संवादाऐवजी दडपशाहीची भावना निर्माण झाली, तर लोकांचा शासनावरील विश्वास कमी होतो.

आज शिक्षण मोफत नाही, आरोग्यसेवा मोफत नाही आणि रोजच्या जगण्याचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. सरकारी किंवा खासगी नोकरी करणाऱ्या व्यक्तीवर जसा महागाईचा परिणाम होतो, तसाच परिणाम रोजंदारीवर काम करणाऱ्या महिलांवर, मजुरांवर आणि अल्पभूधारक किंवा भूमिहीन कुटुंबांवरही होतो. दोनशे-तीनशे रुपयांच्या मजुरीवर कुटुंब चालवणाऱ्या महिलांना आणि वयोवृद्ध कामगारांनाही औषधे, अन्न, शिक्षण आणि घरखर्चाचा तोच भार सहन करावा लागतो. या वास्तवाकडे शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे.

ज्यांच्याकडे जमीन नाही, ज्यांच्याकडे अत्यल्प शेती आहे, ज्यांच्याकडे रोजगार नाही, अशा लाखो कुटुंबांचा स्वतंत्रपणे विचार होणे आवश्यक आहे. विकासाचा अर्थ फक्त मोठे उद्योग, उंच इमारती, महामार्ग किंवा आर्थिक आकडेवारी नसतो. विकास तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा समाजातील शेवटच्या घटकाचे जीवनमान सुधारते. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्याची पहिली जबाबदारी जनतेचे हित जपणे हीच असते. जर शासनाचे लक्ष फक्त उद्योगपती, मोठे गुंतवणूकदार आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांवरच केंद्रित राहिले, तर समाजात विषमता वाढते. सरकार हे जनसेवेचे माध्यम आहे; केवळ आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन करणारी संस्था नाही. भारतीय संस्कृती आपल्याला शिकवते की सत्ता, संपत्ती आणि पद हे कायमस्वरूपी नसते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या कर्माची फळे भोगावी लागतात. धर्मग्रंथांमध्येही वारंवार सांगितले आहे की अन्याय, अहंकार आणि दुर्बलांवर होणारे अत्याचार दीर्घकाळ टिकत नाहीत. महाभारताचा संदेशही हाच आहे की जेव्हा न्यायाचा मार्ग सोडला जातो, तेव्हा त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतात. देश चालवणाऱ्या सर्व सत्ताधाऱ्यांना हात जोडून विनंती आहे—तुम्ही कायम सत्तेत राहणार नाही. तुमच्या पुढच्या पिढ्या, तुमची मुले आणि तुमचा परिवारही याच समाजात राहणार आहे. म्हणून अशी कामगिरी करून जा की पुढील पिढ्या तुमचा अभिमान बाळगतील, टीका करणार नाहीत. जनतेने तुम्हाला सत्ता दिली ती स्वतःच्या कल्याणासाठी, न्यायासाठी आणि समान संधींसाठी.या देशाचे स्वातंत्र्य हजारो क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे मिळाले आहे. त्यांनी आपल्या वैयक्तिक सुखाचा त्याग करून भारताला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. जर आज सामान्य नागरिकाला न्याय, शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सन्मान मिळत नसेल, तर त्या बलिदानांच्या मूल्यांचा आपण पुनर्विचार करण्याची गरज आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हे; तर प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. आज देशाला अशा विकासाची गरज आहे, जो प्रत्येक नागरिकाला सोबत घेऊन पुढे जाईल. गरीब, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, महिला, बेरोजगार युवक, ज्येष्ठ नागरिक आणि वंचित घटक यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे. देशाची प्रगती तेव्हाच खरी मानली जाईल, जेव्हा सर्वसामान्य नागरिकाच्या चेहऱ्यावर समाधान आणि सुरक्षिततेचे हास्य दिसेल.



**शेवटी एवढेच**

सत्ता ही जनतेच्या विश्वासाची ठेव आहे. त्या विश्वासाचा सन्मान करा. संवाद साधा, जनतेचे दुःख समजून घ्या, न्याय्य धोरणे राबवा आणि सर्वसमावेशक विकासाचा मार्ग स्वीकारा. कारण मजबूत राष्ट्राची खरी ताकद त्याच्या सर्वसामान्य नागरिकांच्या सुख, सुरक्षितता आणि सन्मानात असते.

**निवृत्ती तायडे,**
हिवरखेड ता. तेल्हारा जि .अकोला

# वारी परंपरा : श्रद्धा, समाजजागृती की अध्यात्म? आषाढी एकादशीच्या निमित्ताने सत्याचा वेध!



आषाढी एकादशी आली की संपूर्ण महाराष्ट्र "ज्ञानोबा-तुकोबा"च्या जयघोषाने दुमदुमून जातो. लाखो वारकरी टाळ-मृदंगाच्या निनादात, मुखी विठ्ठलनाम आणि हृदयात भक्तिभाव घेऊन पंढरपूरच्या दिशेने पायी चालत निघतात. या वारीला कोणतेही निमंत्रण नसते, कोणतीही नोंदणी नसते, कोणतीही जाहिरात नसते; तरीही दरवर्षी लाखो लोक शेकडो किलोमीटरचा प्रवास स्वतःच्या इच्छेने करतात. हा जगातील सर्वात मोठ्या स्वयंप्रेरित आध्यात्मिक लोकआंदोलनांपैकी एक मानला जातो.परंतु प्रश्न पडतो ही परंपरा कधी सुरू झाली? कोणी सुरू केली? यामागचा मूळ उद्देश काय होता? आणि आजच्या आधुनिक विज्ञानयुगात पायी वारी करण्याचे महत्त्व काय आहे?इतिहासाचा मागोवा घेतला तर पंढरपूर हे प्राचीन तीर्थक्षेत्र असून विठ्ठलभक्तीची परंपरा हजार वर्षांहून अधिक जुनी आहे. परंतु आज ज्या संघटित पालखी सोहळ्याच्या रूपात वारी दिसते, त्या परंपरेला संत परंपरेने आकार दिला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यांसारख्या संतांनी भक्ती ही सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवली. पुढे संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांच्या पालखीची संघटित परंपरा उभी राहिली आणि वारीला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.वारीचा उद्देश केवळ देवदर्शन नव्हता. संतांनी समाजातील जातिभेद, अंधश्रद्धा, अहंकार, अन्याय आणि विषमता दूर करण्यासाठी भक्तीचा मार्ग निवडला. "देव सर्वांचा आहे" हा संदेश त्यांनी दिला. वारी ही समता, बंधुता, प्रेम, सेवा आणि मानवतेची शाळा बनली.

वारकरी कोणत्याही जातीचा, धर्माचा, श्रीमंत किंवा गरीब असो वारीत सर्व समान असतात. एकाच पंगतीत जेवण, एकाच रस्त्यावर चालणे, एकमेकांची सेवा करणे, हरिनाम गाणे आणि परस्परांना मदत करणे हे वारीचे खरे तत्त्वज्ञान आहे. म्हणूनच वारी हा केवळ धार्मिक सोहळा नसून सामाजिक परिवर्तनाचा प्रवाह आहे.कोणालाही निमंत्रण न देता लाखो लोक कसे येतात? याचे उत्तर श्रद्धेत आहे. श्रद्धा ही कोणत्याही प्रसिद्धीपेक्षा मोठी शक्ती आहे. वारकऱ्यांसाठी विठ्ठल हा केवळ देव नसून जीवनाचा आधार आहे. वर्षभराच्या संसारातून काही दिवस आत्मशुद्धी, सामूहिक प्रार्थना आणि संतांच्या विचारांचे स्मरण करण्यासाठी ते वारी करतात. ही प्रेरणा बाहेरून दिली जात नाही; ती अंतर्मनातून जागी होते.

आजच्या आधुनिक युगात पायी चालणे योग्य आहे का? विज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तर नियमित चालणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. समूहात राहणे, संयम पाळणे, साधा आहार घेणे, व्यसनांपासून दूर राहणे आणि शिस्तबद्ध जीवन जगणे याचे अनेक शारीरिक व मानसिक फायदे आहेत. अर्थात योग्य आरोग्य, स्वच्छता, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे.

तथापि, प्रत्येक परंपरेप्रमाणे वारीतही काही आव्हाने आहेत. वाढती गर्दी, पर्यावरणीय प्रदूषण, प्लास्टिकचा वापर, वाहतूक समस्या, अपघात आणि काही ठिकाणी भक्तिपेक्षा दिखाव्याला मिळणारे महत्त्व ही चिंतेची बाब आहे. संतांनी शिकवलेली साधेपणा आणि सेवाभावाची शिकवण जपणे ही काळाची गरज आहे.

वारीमध्ये कोणतेही गूढ किंवा अलौकिक रहस्य आहे का? वस्तुनिष्ठपणे पाहिले तर वारीचे "रहस्य" हे चमत्कारात नाही, तर मानवी मनाच्या सामूहिक शक्तीत आहे. समान ध्येय, समान श्रद्धा, सामूहिक शिस्त, नामस्मरण आणि सामाजिक एकात्मता यांमुळे लाखो लोक कोणत्याही केंद्रीकृत नियंत्रणाशिवाय एकत्र येतात. ही मानवी संस्कृतीची आणि सामाजिक विश्वासाची मोठी ताकद आहे.

वारी अंधश्रद्धा आहे का? याचे उत्तर सरसकट "होय" किंवा "नाही" असे देता येत नाही. संतांच्या शिकवणीनुसार वारी ही विवेक, सदाचार, सेवा, समता आणि भक्ती यांचा मार्ग आहे. परंतु जर कोणी अंधविश्वास, चमत्कारवाद किंवा अवैज्ञानिक दावे वारीशी जोडत असेल, तर ते संतांच्या मूळ विचारांशी सुसंगत नाही. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आणि संत गाडगेबाबा यांनी विवेक, स्वच्छता आणि नैतिकतेलाच खरे धर्म मानले.आज गरज आहे ती वारीचा मूळ आत्मा जपण्याची. वारी म्हणजे केवळ पायी चालणे नाही; तर अहंकाराचा त्याग, सेवाभाव, शिस्त, पर्यावरण संरक्षण, व्यसनमुक्ती, सामाजिक समता आणि मानवतेची साधना आहे.

आषाढी एकादशीचा खरा संदेश मंदिरात पोहोचण्यात नाही, तर मनातील विकार दूर करण्यात आहे. पंढरपूरचा विठ्ठल प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे. वारी आपल्याला शिकवते की देवापर्यंत जाण्याचा मार्ग पायांनी नव्हे, तर चांगल्या विचारांनी, सेवाभावाने आणि सत्यनिष्ठ जीवनाने जातो.म्हणूनच हजारो वर्षांची ही परंपरा आजही जिवंत आहे. ती केवळ धार्मिक विधी नाही; ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीची, सामाजिक ऐक्याची आणि अध्यात्मिक उन्नतीची अखंड वाहणारी जीवनगंगा आहे. वारीचे सत्य चमत्कारात नसून मानवतेत आहे; आणि हाच तिचा सर्वात मोठा संदेश आहे.

**गजानन ओंकार हरणे,**
खडकी, अकोला .
9822942623.

# आषाढी वारीसाठी सरकारची जय्यत तयारी ! यंदा प्रथमच 'एअर ॲम्बुलन्स' सज्ज

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरीत विठू माऊलीच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित, आरोग्यदायी आणि सुखकर व्हावा, यासाठी राज्य सरकारने व्यापक आणि सूक्ष्म नियोजन केले आहे. पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी आतापर्यंत ६७१ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. यंदाच्या वारीत वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आणि सेवेसाठी प्रशासनाने कंबर कसली असून, अनेक अत्याधुनिक सुविधा पुरवल्या जाणार आहेत. विविध विभागांच्या पूर्वतयारीचा आढावा घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रशासनाला आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा युद्धपातळीवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

यंदाच्या आषाढी वारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रथमच 'एअर ॲम्बुलन्स' तैनात करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. आणीबाणीच्या प्रसंगी गंभीर रुग्णांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी यासाठी एमएसआरडीसीला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासोबतच पालखी मार्ग आणि पंढरपुरात अतिरिक्त रुग्णवाहिका, विशेष वैद्यकीय पथके, जागोजागी उपचार केंद्रे आणि भाविकांसाठी विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे.



**पायाभूत सुविधांसाठी ६७१ कोटींचा निधी**

पंढरपूरचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी राज्य सरकारने निधीचा ओघ सुरूच ठेवला आहे. आतापर्यंत ६७१ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली असून, त्यातून खालील कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जात आहेत.

**रस्त्यांचे जाळे:** शहरांतर्गत आणि बाहेरील प्रमुख रस्त्यांचे खड्डेमुक्त सक्षमीकरण.

**दर्शन मंडप:** भाविकांना तासनतास उन्हा-पावसात उभे राहावे लागू नये म्हणून आधुनिक दर्शन मंडपाची उभारणी.

वारकरी सुविधा केंद्रे: पिण्याचे पाणी, निवास आणि इतर मूलभूत सोयींनी सज्ज केंद्रे. 'कामांसाठी आणखी निधीची आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने प्रस्ताव सादर करावा. नगरविकास विभागाकडून आवश्यक तो निधी तातडीने उपलब्ध करून दिला जाईल,' अशी ग्वाही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.लाखो भाविकांच्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्वच यंत्रणांना सतर्क करण्यात आले आहे.सुरक्षेचा उपाय म्हणून यंदा एनडीआरएफ ची पथके तैनात असणार आहेत. तसेच संपूर्ण परिसरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून चोख देखरेख ठेवली जाईल. वारकऱ्यांची ने-आण करण्यासाठी एसटी महामंडळाकडून अतिरिक्त एसटी बसेस सोडण्यात येणार असून, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक व्यवस्थापनाचा विशेष आराखडा तयार केला आहे. लाखो लोक एकत्र येत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पंढरपूर शहर आणि पालखी मार्गांवर स्वच्छतेवर विशेष भर दिला जात आहे.

**'लाखो वारकऱ्यांची सेवा हीच आमची प्राथमिकता'**

बैठकीत प्रशासनाला मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा आत्मा आहे. लाखो वारकऱ्यांची सेवा करणे हीच सरकारची प्राथमिकता आहे. त्यामुळे नगरपरिषद, जिल्हा प्रशासन, आरोग्य, पोलीस, अग्निशमन, परिवहन, वीज आणि मंदिर समिती या सर्व यंत्रणांनी एकमेकांमध्ये समन्वय ठेवून एकाच टीमप्रमाणे काम करावे. वारी संपवून परतताना प्रत्येक वारकऱ्याच्या तोंडी 'यंदाचे नियोजन उत्कृष्ट होते' हेच कृतज्ञतेचे शब्द असायला हवेत, अशा रीतीने प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडावी.'

# 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' आषाढी वारीतील 3.83 लाखांहून अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारी २०२६ मध्ये सहभागी झालेल्या वारकरी भाविकांना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत व्यापक आणि दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून, 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारली जात आहे. आजपर्यंत ३ लाख ८३ हजार ६४३ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली आहे. ३ लाख ८० हजार ४८५ बाह्यरुग्णांवर उपचार, ३ हजार १५८ रुग्णांना आंतररुग्ण सेवा आणि ८८३ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे. वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका, ४३ सुसज्ज आयसीयू, १५६ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना', २१५ आरोग्यदूत, ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी आणि ३०२ तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत आहेत. पंढरपूरमध्ये २४ तास कार्यरत आयसीयू, ३ दिवसांचे महाआरोग्य शिबिर, तसेच यंदाच्या वारीचे विशेष आकर्षण असलेली एअर ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

याशिवाय पालखी मार्गावरील पाणी स्रोतांचे सर्वेक्षण व निर्जंतुकीकरण, डेंग्यू-मलेरिया आदी कीटकजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना, हॉटेल व धाब्यांमधील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, वारीनंतर विशेष स्वच्छता मोहीम, असंसर्गजन्य आजारांची तपासणी, आरोग्य जनजागृती तसेच 'आरोग्यसंपन्न वारी' डिजिटल ॲपच्या माध्यमातून तातडीच्या आरोग्य सुविधांची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभाग वारकऱ्यांना सुरक्षित, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून, वारीच्या संपूर्ण कालावधीत आरोग्य यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने आषाढी वारीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'संवाद वारी' उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या डिजिटल चित्ररथाला आज इंदापूर तालुक्यातील बेलवडी येथे राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सदिच्छा भेट दिली. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यादरम्यान त्यांनी डिजिटल चित्ररथातील विविध आधुनिक तंत्रज्ञानाधारित उपक्रमांची पाहणी केली.

यावेळी श्री.शेलार आणि श्री.भरणे यांनी राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना, विकासकामे आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या डिजिटल सादरीकरणाची पाहणी केली. तसेच चित्ररथामध्ये उपलब्ध असलेल्या एआय आधारित चॅटबॉट प्रश्नमंजूषेचा अनुभव घेत शासनाच्या विविध योजनांबाबत प्रश्न विचारले. वारकऱ्यांना सोप्या आणि आकर्षक पद्धतीने माहिती देणाऱ्या या उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने पारंपरिक वारीसोबत आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाची प्रभावी सांगड घालत शासनाच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. 'संवाद वारी' ही नागरिकांशी प्रभावी संवाद साधणारी संकल्पना असून, डिजिटल माध्यमांचा वापर करून शासनाच्या योजना अधिक सुलभ, आकर्षक आणि परिणामकारक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचविण्याचा हा स्तुत्य प्रयत्न असल्याचे मंत्री श्री.शेलार यांनी सांगितले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनीही वारीसारख्या मोठ्या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यात शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी उभारण्यात आलेला हा डिजिटल चित्ररथ अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले. एआयसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नागरिकांना त्वरित आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देण्यासाठी असा उपक्रम आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित वारकरी, भाविक आणि नागरिकांनी डिजिटल माहिती, दृश्यफिती तसेच एआय चॅटबॉटच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती जाणून घेत उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा 'संवाद वारी' हा डिजिटल चित्ररथ आषाढी वारी मार्गावरील विविध ठिकाणी वारकरी, भाविक आणि नागरिकांना शासनाच्या लोकाभिमुख योजना, विकासकामे आणि जनकल्याणकारी उपक्रमांची माहिती आधुनिक तंत्रज्ञान आणि लोककलेच्या समन्वयातून प्रभावीपणे उपलब्ध करून देत आहे.

३
सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. २० जुलै २०२६
Web. http://epaper:citynewssuperfast.com

# जुने शहरातील श्री विठ्ठल मंदिर येथे आषाढी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे आयोजन

प्रतिनिधी २० जुलै

**अकोला** : जिल्हामधील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले जुने शहर स्थित ३२२ वर्ष पुरातन श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह चें आयोजन करण्यात आले आहे.

हा सप्ताह बुधवार २२-०७-२०२६ (आषाढ शुद्ध नवमी) ते बुधवार दि. २९-७-२०२६ (आषाढ शुद्ध पौर्णिमा) पर्यंत आयोजित केला आहे. या सप्ताहमध्ये अखंड प्रहर म्हणजेच वीणावादन, हरिपाठ, भजन, भक्तीसंगीत कार्यक्रम, कीर्तन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी मंदिरात राष्ट्रीय कीर्तनकार, कीर्तन वैजयंती व कीर्तनशारदा या उपाधीने सन्मानित ह. भ. प. डॉ नंदिनीताई कडूस्कर, नागपूर यांचे दररोज रात्री ८ ते १० या वेळी कीर्तन होणार आहे. तसेंच सप्ताहभर विविध भजनी मंडळाची भजनसेवा सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत अखंड असणार असून रोज सायंकाळी ६ ते रात्री ८ पर्यंत भक्तीसंगीताचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे .

दिनांक २५ जुलै रोजी अर्थात देवशयनी आषाढी एकादशी च्या दिवशी पहाटे ४ वाजता श्री विठ्ठल रुख्मिणी यांच्या मूर्तीस



षोडशोपचार पूजा व अभिषेक मंडळाचे सर्वसेवाधिकारी श्री कृष्णा गोवर्धनजी शर्मा व सौ अर्चना शर्मा यांचे हस्ते करण्यात येणार आहे. आषाढी एकादशी च्या दिवशी मंदिरात भक्तांची अलोट गर्दी होत असते, परिसरात जत्रेचे स्वरूप येते, आपल्या लाडक्या विठुरायाचे रूप डोळ्यात साठवण्यासाठी माता भगिनी व पंचक्रोशी मधील भाविक गर्दी करतात. आषाढ पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी गोपाळकाला, कीर्तन व दहीहंडी चा कार्यक्रम होतं असून सायंकाळी ५ वाजता श्री विठ्ठल रुख्मिणी यांची भव्य शोभयात्रा महानगरमधून निघते. तसेंच शोभयात्रा नंतर महाप्रसादाने या सप्ताहची सांगता करण्यात येते.

तरी सर्व धर्मप्रेमींना विनंती की त्यांनी तन, मन, धन पूर्वक या सप्ताहास सहाय्य करावे व श्री विठ्ठल सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाचे सर्वसेवाधिकारी कृष्णा गोवर्धनजी शर्मा, अध्यक्ष अशोकसेठ मनवाणी, संस्थानचें विश्वस्त ॲडव्होकेट गिरीश देशपांडे, महिला अध्यक्षा श्रीमती यमुताई नळकांडे, कार्याध्यक्ष रमेश कोठारी, उपाध्यक्ष सर्वश्री डॉ कृष्णा साव अशोक गुप्ता हरिशभाई लाखाणी बाबासाहेब पाठक नानकरामजी राजपाल ब्रिजमोहन चितलांगे ॲड. शैलेश जोशी विलास अनासने किशोर मांगटे पाटील सिद्धार्थ शर्मा प्रवीण वाणी व व्यवस्थापक रमेश अलकरी यांनी केले आहे.

## तिथी अग्रवालचे नीट परीक्षेत घवघवीत यश



**मूर्तिजापूर :** येथील तिथी प्रवीण अग्रवाल हिने राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा नीट मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. 720 पैकी 654 गुण मिळवत 99.93 पर्सेंटाईल प्राप्त केले असून, ऑल इंडिया रँक 1206 मिळवून आपल्या कुटुंबासह संपूर्ण मूर्तिजापूरचे नाव उज्वल केले आहे.

कु. तिथी या मूर्तिजापूर येथील आरआर ग्रुपचे स्व. ओमप्रकाश, कैलाश, श्यामसुंदर व गोविंद यांच्या नात, व प्रसिद्ध समाजसेवक एडवोकेट. अविन अग्रवाल यांच्या भाची तसेच सुप्रसिद्ध डॉ. प्रवीण अग्रवाल यांच्या सुपुत्री आहेत. त्यांच्या या यशामुळे अग्रवाल समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या : नयन गायकवाड




**अकोला** : लडाखचे पर्यावरणवादी व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या CJP च्या नीट पेपर फुटी जबाबदारी शिक्षणमंत्र्यांनी घ्यावी आणि त्यांचा राजीनामा व्हावा या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयापासून महावीर किराणा परिसरापर्यंत मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर, महावीर किराणा दुकानासमोर, राजेश्वर मंदिरामागे, शिवाजीनगर, जुने शहर, अकोला येथे निदर्शने करण्यात आली.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी मोदी सरकार घाबरले, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, आत्महत्या केलेल्या विद्यार्थी यांच्या परिवार यांना नुकसान भरपाई द्या अशा घोषणा देत केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेध केला. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने कॉम्रेड नयन गायकवाड यांच्या व्दारे सांगण्यात आले की, लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनाशी कोणतीही चर्चा न करता दडपशाहीचा मार्ग स्वीकारणे हे संविधानिक मूल्यांवर आघात करणारे आहे. या आंदोलनात कॉ. नयन गायकवाड, कॉ. संगीता सुखदाने, कॉ. सुमित गायकवाड, सौ. प्रविना मनवर, सौ. शिलल ददी, सुनिता जाधव, रंजना आठवले, कमल खैरे, अर्चना तडस, निता टोहरे, कल्पणा तेलगोटे, वंदना मोरे, वंदना साळवे, प्रज्ञा प्रधान, वंदना साळवे, सुरेखा पडघाण सह भारतीय कम्युनिस्ट पक्ष, आयटक कामगार संघटना व ऑल इंडिया युथ फेडरेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले.

# कावड यात्रेतील शिवभक्तांच्या आरोग्य सेवेसाठी मोठा निर्णय; जिल्हा परिषदेकडून निधी मंजूर!

प्रतिनिधी १९ जुलै

## निलेश देव यांच्या पाठपुराव्याला यश

**अकोला** : श्रावण महिन्यात गांधीग्राम ते अकोला दरम्यान आयोजित करण्यात येणारी कावड यात्रेतील शिवभक्तांसाठी 'आपला दवाखाना' उपक्रमासाठी जिल्हा परिषद, अकोलाने २ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निर्णयामागे वंचित बहुजन आघाडीचे गटनेते निलेश देव यांनी गेल्या सहा वर्षांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वपूर्ण आहे.जिल्हा परिषद अकोलाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाने १५ जुलै २०२६ रोजी दिलेल्या अधिकृत पत्रानुसार, गांधीग्राम येथील कावड यात्रेकरूसाठी आरोग्य सेवांची व्यवस्था करण्यासाठी सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पातून २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त खर्चही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



श्रावण सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या गांधीग्राम ते अकोला कावड यात्रेदरम्यान 'आपला दवाखाना' उपक्रम पुन्हा एकदा भाविकांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहे.

कावड मार्गावर १० ठिकाणी रुग्णवाहिकांची व्यवस्था तात्पुरती आरोग्य तपासणी केंद्रे, अनुभवी डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचारी, प्रशिक्षित स्वयंसेवक आवश्यक औषधे व प्राथमिक उपचार, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळेल. यामुळे यात्रेदरम्यान कोणत्याही भाविकाची प्रकृती अचानक बिघडल्यास त्याला तातडीने उपचार मिळू शकतील. या उपक्रमासाठी सातत्याने सहकार्य करणारे अँड. बाळासाहेब आंबेडकर, प्रा. अंजली आंबेडकर, जिल्हा परिषद अकोला, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, डॉक्टर, परिचारिका, स्वयंसेवक तसेच सर्व सामाजिक कार्यकर्ते आणि प्रशासनाचे निलेश देव यांनी आभार मानले.

# ईव्हीएमद्वारे भारत विद्यालयात शालेय प्रतिनिधींची निवडणूक उत्साहात

## विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, मतदानाविषयी जागरूकता निर्माण

प्रतिनिधी २० जुलै

**अकोला** : भारत विद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही शालेय प्रतिनिधींची निवडणूक ईव्हीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या संकल्पनेवर आधारित डिजिटल पद्धतीने यशस्वीरीत्या पार पडली. टॅब व मोबाईलच्या सहाय्याने पेपरलेस मतदान प्रक्रिया राबवून विद्यार्थ्यांना लोकशाहीतील गुप्त मतदानाची प्रत्यक्ष अनुभूती देण्यात आली.

भारत विद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही शालेय प्रतिनिधींची निवडणूक ईव्हीएम ने निवडले गेले.यावेळी शालेय प्रमुख, शालेय उपप्रमुख, खेळ प्रमुख, स्वच्छता प्रमुख आणि वाङ्मय प्रमुख या पाच पदांसाठी निवडणूक घेण्यात आली. या पदांसाठी एकूण ४० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. तर १३० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मतदानाचा हक्क बजावला.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सहाय्यकांची व्यवस्था करून त्यांनाही मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले. निवडणुकीत शालेय प्रमुख म्हणून चि. समर्थ गर्जे व कु. केतकी खंडारे, शालेय उपप्रमुख म्हणून चि. भावेश शर्मा व कु. ईशा भगत, खेळ प्रमुख म्हणून चि. मयंक अंभोरे व कु. ज्ञानेश्वरी पागधुने, स्वच्छता प्रमुख म्हणून चि. उत्कर्ष गावंडे व कु. आराध्या इंगळे तसेच वाङ्मय प्रमुख म्हणून कु. स्वरा टिकार व चि. कृष्णा केदार हे विद्यार्थी विजयी झाले. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे नियोजन मुख्य निवडणूक अधिकारी तथा उपमुख्याध्यापक श्री. योगेश मल्लेकर यांनी केले. मुख्याध्यापक तथा निवडणूक आयोगाचे अध्यक्ष श्री. संजय घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक पार पडली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निवडणूक विभाग प्रमुख श्री. दीपक सोलकर, क्षेत्रीय अधिकारी श्री. काळपांडे, केंद्राध्यक्ष सौ. वानखडे मॅडम, श्रीमती वंदना देशमुख, कु. सोळंके, तंत्रज्ञान शिक्षक श्री. अमोल पटोकार, श्री. इंगळे तसेच मतदान अधिकारी श्री. गवारे, श्री. यादव, श्री. शेंडे, श्री. सोळंके, घाटोळ मॅडम, सराफ मॅडम, पांडे मॅडम, वरघट मॅडम आणि इंगळे मॅडम यांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, मतदानाविषयी जागरूकता आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे

# परशुराम नाईक विद्यालयात 503 विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी



प्रतिनिधी २० जुलै

**अकोला :** विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि आपत्कालीन परिस्थितीत रक्तगटाची माहिती सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने परशुराम नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बोरगाव मंजू येथे भव्य रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल ५०३ विद्यार्थ्यांच्या रक्तगटाची तपासणी करण्यात आली. अकोला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पळसो प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष किरण नाईक यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना किरण नाईक यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःचा रक्तगट माहिती असणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, आपत्कालीन परिस्थितीत यामुळे जीव वाचविण्यास मोठी मदत होते, असे नमूद केले. शिबिरात डॉ. रूपाली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रहमान खान, डॉ. भूषण देशमुख, डॉ. प्रीती लहाने, वर्षा ठाकरे, समीर शेख, भारत भिसे, दत्ता मेटांगे, अनिता ढोरे, किरण वानखडे, अक्षय चहाकर, शोभा वानखडे आणि सुवर्णा खडे यांनी विद्यार्थ्यांच्या रक्तगट तपासणीचे काम यशस्वीपणे पार पाडले. यावेळी संस्थेचे सदस्य अतुल नाईक, उपमुख्याध्यापक शंकर भदे, पर्यवेक्षक रमेश भड, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडीलांच्या अंतिम विधीला मुलीकडून अखेरचा निरोप



**अकोला** : येथील डाबकी रोड येथील रहिवाशी तथा पत्रकार अंकित क-हे यांचे मोठे वडील स्व.रमेश नारायण क-हे यांनी आपली ओळख एका किराणा दुकानातून संपुर्ण सोनार समाज निर्माण केली होती ईश्वर कृपेने पत्नी कुसुम रमेश क-हे, व त्यांना 3 मुली आहेत सौ. विजया कैलास विंचणकर, सौ.रंजना राजेश रत्नपारखी ,सौ. ज्योती विलास विंचणकर, नामक मुली असतांनाच अचानक रमेश नारायण क-हे यांना देवादज्ञा झाली वडीलांच्या मार्गदर्शनाखाली लहानाची आठवण करुन अखेर वडीलांवर अंतीम संस्कार करण्याचा योग्य निर्णय घेऊन अकोला येथील शासकिय इतमामात मुलींनी वडीलांवर अंतीम संस्कार केले आहेत त्यामुळे संपूर्ण अकोला जिल्हात सर्वात जास्त ओळ लागली असून अनेक समाज बांधवांनी अंतीम विधी कार्यक्रम स्थळाचे दुश्य पाहून आनंद अश्रू पाहायला मिळाले .

## 'एसएओं'नी घेतला तक्रार निवारण कामाचा आढावा

**अकोला** : जिल्ह्यातील सोयाबीन उगवले नसल्याच्या तक्रार निवारण कामाचा आढावा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी शुक्रवारी घेतला. यंदाच्या खरीप हंगामात पेरणीनंतर सोयाबीन बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यानुषंगाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांकडून तपासणी सुरू करण्यात आली आहे.

## निधन वार्ता

**आत्माराम पदमने**



**भोड** : येथील प्रतिष्ठित नागरीक तथा सेवानिवृत्त मंडळ अधिकारी आत्माराम झिंग्राजी पदमने (वय ८९) वर्षे यांचे आज सकाळी १०.३८ ला निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर आज दूपारी ४ वा. अंत्यसंस्कार करण्यात येतील.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**अमरावती विद्युत विभाग, सा.बां. विभाग, अमरावती**
**सा.बां. विभाग, परिसर कॅम्प, अमरावती**
**दरसुचना ( कोटेशन नोटीस ) क्र. 20/2026-27**

**कामाचे नांव :** Providing New DG Set For Sonography, X-ray unit At GMC Akola Dist. Akola

| Sr. No. | CSR ITEM | QTY | DISCRIPTION OF ITEM | RATE | UNIT | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NON CSR | 1.00 | Supplying, erecting, testing and commissioning of diesel generating set confirming to CPCB-IV plus Emission Norms with alternator of 160 KVA output continuous rating, 3 phase, 415 V, 50 Hz, 0.8 p.f., A.C. supply, a totally enclosed air cooled / liquid cooled multi-cylinder diesel engine developing suitable BHP at 1500 rpm with 10% overload for 1 hour in 12 hours, along with standard accessories, self-excited, self-regulated, screen protected alternator with static excitation system running at 1500 RPM as per IS 4722-2001 with voltage regulation +/- 5%, with performance class G2/G3 and maximum fuel consumption 27.8 ltr/hr @75% loading. Both the engine and alternator direct coupled on a common fabricated steel base frame and mounted on anti-vibrating pads, with standard control panel comprising meters, switchgears, indicators connected with suitable wires/cables, the complete set enclosed in composite acoustic enclosure as fully assembled integral unit made of 16 SWG CRCA sheet, sound absorbing material to restrict sound level up to 75 dB at 1.0 m, provided with first filling of oil, diesel not less than 290 ltr etc., on provided M20 grade CC foundation as per specification no. GEN-DG | | Each | |
| | | | | | TOTAL RS | |

कार्यकारी अभियंता, सा.बां. (विद्युत) विभाग, अमरावती अंतर्गत दरसुची बाहय दर निश्चित करण्यासाठी खालील बाबींकरीता मान्यताप्राप्त उत्पादक, वितरक व विद्युत कंत्राटदार यांचेकडून दराबाबत दरपत्रक (कोटेशन) मोहोरबंद लिफाफ्यामध्ये अथवा ई-मेलव्दारे मागविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | : | दि. २०.०७.२०२६ ते २७.०७.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण | : | कार्यकारी अभियंता, सा.बां. (विद्युत) विभाग, अमरावती सा.बां. परिसर कॅम्प, अमरावती. |
| ई-मेल आयडी | : | elamaravati.ce@mahapwd.gov.in |
| दुरध्वनी क्रमांक | : | ०७२१-२६६२६४५/ फॅक्स क्र. ०७२१-२६६०९०७. |

**टिप :** १) दरपत्रक सादर करण्याकरीता मान्यताप्राप्त उत्पादक किंवा वितरक असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक. २) दरपत्रक सादर करावयाच्या कालावधीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. ३) दरपत्रक सादर करतांना जीएसटी वेगळा दर्शविण्यात यावा.

पत्र क्र. का.अ./(वि)/अम/निविदा/१७३२/२०२६
कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय
अमरावती सा.बां. (विद्युत) विभाग,
सा.बां. विभाग, परिसर कॅम्प, अमरावती ४४४६०२
ई-मेल: elamaravati.ee@mahapwd.gov.in
दिनांक १४/०७/२०२६ **वि.मा.का./अम./जाहि./३४३/२०२६-२०२७**

**(सा.कृ. शेंडे)**
कार्यकारी अभियंता
सा.बां (विद्युत) विभाग, अमरावती

# आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये मानप्रदान उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २० जुलै




**अकोला :** आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये १७ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता शाळेच्या प्रांगणात मानप्रदान (इन्व्हेस्टिचर सेरेमनी) कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांना लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया व तिचे महत्त्व समजावे, या उद्देशाने शाळेत १४ जुलै रोजी विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या. त्या निवडणुकांचे निकाल जाहीर करण्यासाठी आयोजित कार्यक्रमास शाळेचे संचालक श्री दिलीपराजजी गोयंका, प्राचार्य कुरियचन सी. पी., उपप्राचार्या श्वेता चोमवाल, भारतीय सेवा सदनच्या सदस्या शिक्षिका इंदुबाला चौधरी तसेच मुख्य समन्वयक गुरनीत कौर ओबेरॉय यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या संस्थापिका मधु माँ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ब्लू हाऊसला विजेता घोषित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते ब्लू हाऊसच्या प्रमुख शिक्षिका भूमिका ननवानी तसेच ब्लू हाऊसच्या सर्व सदस्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यानंतर विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर करण्यात आले. रेड हाऊस कॅप्टन म्हणून पार्थ ढोरे व व्हाइस कॅप्टन म्हणून लावण्या लहुडकर यांची निवड जाहीर करण्यात आली. ब्लू हाऊस कॅप्टन म्हणून मौलिक चौहान व व्हाइस कॅप्टन अक्षिता झनक, ग्रीन हाऊस कॅप्टन तनिष्क चौहान व व्हाइस कॅप्टन रिधिमा ताठे, यलो हाऊस कॅप्टन कनक राठी व व्हाइस कॅप्टन शाम अग्रवाल यांची निवड जाहीर करण्यात आली.

याशिवाय एज्युकेशन मिनिस्टर म्हणून श्रीशांत टाले व डेप्युटी एज्युकेशन मिनिस्टर म्हणून कार्तिकी पिंपळे, डिसिप्लिन मिनिस्टर म्हणून जश जोगी व डेप्युटी डिसिप्लिन मिनिस्टर म्हणून कृतिका चवरे, कल्चरल मिनिस्टर म्हणून वैष्णवी आडे व डेप्युटी कल्चरल मिनिस्टर म्हणून लक्ष चंदन, स्पोर्ट्स मिनिस्टर म्हणून नैतिक राठी व डेप्युटी स्पोर्ट्स मिनिस्टर म्हणून नमन लोहिया, क्लीनलिनेस मिनिस्टर म्हणून जान्हवी झोडपे व डेप्युटी क्लीनलिनेस मिनिस्टर म्हणून ओजस बडोदे तसेच इनोव्हेशन अँड रिसर्च मिनिस्टर म्हणून मंथन देशमुख यांची निवड घोषित करण्यात आली.

शाळेचा हेड बॉय म्हणून अभिराज पागृत व हेड गर्ल म्हणून अनन्या देशमुख तसेच असिस्टंट हेड बॉय विरम संकलेचा व असिस्टेंट हेड गर्ल म्हणून आरना जोशीची निवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सर्व नव्याने नियुक्त झालेल्या विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना बॅच व सैशे परिधान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षक अभिजीत भाटवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी परिषद सदस्यांचा शपथविधी संपन्न झाला.

यावेळी शाळेचे संचालक श्री दिलीपराजजी गोयंका तसेच प्राचार्य कुरियचन सी. पी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. हेड गर्ल अनन्या देशमुख व हेड बॉय अभिराज पागृत यांनीही आपले मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी देवश्री गोमासे व इयत्ता नववीतील विद्यार्थिनी दिशा लोहिया यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षिका स्मिता मालपानी यांनी केले.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य कुरियचन सी. पी. व उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षिका दुर्गा पाठक, क्रीडा शिक्षक पंकज कोकाटे व भूषण पाटील यांनी विशेष सहकार्य केले. तसेच इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही अथक परिश्रम घेतले. शेवटी 'वंदे मातरम्' गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २० जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# यवतमाळ-आर्णी-माहूर रेल्वे मार्गाला मुनगंटीवारांचे समर्थन

## रेल्वेमंत्र्यांना पत्र, कृती समितीच्या लढ्याला बळ

प्रतिनिधी २० जुलै

**आर्णी :** यवतमाळ-आर्णी-हिवरा-माहूर-किनवट या प्रस्तावित नव्या रेल्वे मार्गाच्या मागणीला आता राज्याचे माजी मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार सुधीर मुनगंटीवार यांचेही समर्थन मिळाले आहे. केंद्रीय कृती समितीच्या मागणीची दखल घेत मुनगंटीवार यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र पाठवून हा रेल्वे मार्ग तातडीने मंजूर करण्याची विनंती केली आहे.

पत्रात या रेल्वे मार्गामुळे यवतमाळ, आर्णी, हिवरा, माहूर आणि किनवट परिसरातील नागरिकांना



मोठा दिलासा मिळणार असून, प्रवास, व्यापार, पर्यटन आणि स्थानिक विकासाला चालना मिळेल, असे नमूद करण्यात आले आहे. या मार्गामुळे विदर्भ व मराठवाडा यांच्यातील संपर्क अधिक सक्षम होईल, असा मुद्दाही त्यांनी मांडला आहे.

मुनगंटीवार यांच्या पाठिंब्यामुळे रेल्वे कृती समितीच्या जनआंदोलनाला अधिक बळ मिळाल्याची भावना समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. लोकचळवळीचे स्वरूप धारण केलेल्या या मागणीसाठी विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी पुढे येत असल्याने रेल्वे मार्ग मंजुरीबाबत आशादायक वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, शनिवारी (१८ जुलै) माहूर येथे आयोजित कार्यक्रमात चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनीही या रेल्वे मार्गाचा मुद्दा संसदेत मांडण्याचे आश्वासन दिले होते. श्रेयवादापेक्षा विकास महत्त्वाचा असल्याचे सांगत, केंद्र सरकारकडे रेल्वेमंत्री, पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचा शब्द त्यांनी दिला होता. आता त्यानंतर लगेचच माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी रेल्वेमंत्र्यांना पत्र पाठविल्याने या मागणीला आणखी राजकीय पाठबळ मिळाले आहे. सर्वपक्षीय समर्थन वाढत असल्याने यवतमाळ-आर्णी-हिवरा-माहूर-किनवट रेल्वे मार्ग मंजुरीची अपेक्षा अधिक बळावल्याचे चित्र असून, केंद्रीय कृती समितीने मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले.

## विजेचा धक्का : सालगड्याचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी २० जुलै

**उमरखेड :** तालुक्यातील चातारी गावाजवळील धार शेतशिवारात मोटार पंप सुरू करण्यासाठी गेलेल्या



सालगड्याचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दिनेश शंकर माने रा. चातारी) असे मृताचे नाव आहे. ते आशिष माने यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करत होते. रविवारी सकाळी मोटार पंप सुरू किंवा बंद करण्यासाठी ते स्टार्टरजवळ गेले असता, स्टार्टरच्या पेटीतून विजेचा धक्का लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटना लक्षात येताच उंचवड येथील सतीश कदम यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पीएसआय सुदर्शन वानोळे आणि पोलीस शिपाई हनुमंत मुसळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उमरखेड येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार नरेंद्र पुंड पुढील तपास करीत आहेत.

# एक कोटींचा पूल धोक्यात; दोन वर्षांपासून प्रशासन झोपेत



## बहुजन मुक्ती पार्टीचा हल्लाबोल

प्रतिनिधी २० जुलै

**दारव्हा :** तळेगाव ते फुबगाव (मुस्लिम कब्रस्थान मार्ग) येथील सुमारे एक कोटी रुपये खर्चाच्या पुलाची अवस्था गेल्या दोन वर्षांपासून धोकादायक असूनही संबंधित प्रशासनाकडून ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीने केला आहे.

पुलावरील वाढता धोका लक्षात घेता तातडीने वाहतूक बंद करून नवीन पूल उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. २, दारव्हा यांच्या अखत्यारीतील या पुलाचे बांधकाम सुरू असतानाच ऑगस्ट २०२४ मधील मुसळधार पावसात पुलाचा मध्यभाग दोन ते तीन फूट खचला होता. त्यानंतर या घटनेची मोठी चर्चा झाली; मात्र आजपर्यंत कोणत्याही दोषींवर कारवाई झालेली नाही किंवा पुलाची दुरुस्तीही करण्यात आलेली नाही, असा आरोप करण्यात आला आहे. सध्या या पुलावरून वाहतूक सुरू असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी इशारा फलक, संरक्षक बॅरिकेड्स किंवा वाहतूक बंदीची कोणतीही व्यवस्था नसल्याचे बहुजन मुक्ती पार्टीने म्हटले आहे. पुलावर मोठ्या फटी, तडे, उघड्या सळया आणि ढासळलेली रचना असल्याने गंभीर अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी तातडीने पूल वाहतुकीसाठी बंद करून नवीन पूल उभारण्याची मागणी केली आहे.

तसेच या पुलावर अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग दारव्हा, जिल्हा परिषद बांधकाम विभाग यवतमाळ, जिल्हाधिकारी, पालकमंत्री आणि संबंधित खासदार यांच्यावर राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# विद्यार्थिनीचा विनयभंग; पोक्सो अंतर्गत दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी २० जुलै

**पांढरकवडा :** शाळा सुटल्यानंतर ट्यूशनला जाणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीचा हात पकडून विनयभंग करणाऱ्या आणि तिचा पाठलाग करणाऱ्या दोन नराधमांविरुद्ध पांढरकवडा पोलिसांनी पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. ही घटना केळापूर परिसरात घडली.

रोहित रामा नेहारे (वय २७) आणि आकाश दिगंबर ठाकरे (वय २८, दोघेही रा. कवठा, ता. केळापूर) अशी आरोपींची नावे आहेत. पीडित मुलगी पाटणबोरी येथील शाळेत इयत्ता १०वीत शिकते. ती रोज शाळा व ट्यूशनसाठी गावाहून ये-जा करते.

ती नेहमीप्रमाणे मैत्रिणीसोबत ट्यूशनला जात असताना आरोपींनी ट्यूशनच्या गेटवर तिला गाठले. रोहितने तिचा हात पकडून लज्जास्पद वर्तन केले आणि बोलण्याचा आग्रह धरला. पीडितेने स्वतःची सुटका करून ट्यूशनच्या रूममध्ये धाव घेतली. मात्र, निर्लज्ज आरोपी थेट क्लासरूममध्ये घुसला. मुलगी घाबरल्याने तिच्या मैत्रिणीने शिक्षकांना सांगण्याची धमकी दिल्यानंतर दोघे पळून गेले.

पीडित मुलगीने पोलिसांना सांगितले की, गेल्या दोन दिवसांपासून हे दोघे बसस्थानकापासून ट्यूशनपर्यंत तिचा वाईट हेतूने पाठलाग करत होते. घडलेला प्रकार तिने घरी सांगितल्यानंतर पालकांनी तातडीने पांढरकवडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

सपोनि सागर पेंढारकर यांच्या मार्गदर्शनाखाली पांढरकवडा पोलिसांनी आरोपी रोहित नेहारे आणि आकाश ठाकरे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७८, ३(५) सह पोक्सो कायद्यांतर्गत कलम ८, १२ नुसार गुन्हा नोंदवला आहे. या घटनेमुळे परिसरात महिलां व मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# उमरखेड बसस्थानकासमोर खासगी वाहनांचा विळखा

## प्रवाशांचा जीव धोक्यात, कारवाईची मागणी

प्रतिनिधी २० जुलै

**उमरखेड :** उमरखेड शहरातील नांदेड रोडवरील एसटी बसस्थानकासमोर खासगी ट्रॅव्हल्स, ऑटो आणि इतर वाहनांचा वाढता विळखा वाहतुकीसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. बसस्थानकासमोरच खासगी वाहनांमधून सर्रास प्रवासी भरले जात असल्याने एसटी बसेसना स्थानकात ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे या ठिकाणी तातडीने वाहतूक शिस्त लागू करून रस्ता मोकळा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या




नांदेड रोडवर बसस्थानक असल्याने परिसरात दिवसभर मोठी रहदारी असते. बसस्थानकासमोर ट्रॅव्हल्स कार्यालये, हॉटेल, भोजनालये, दवाखाने तसेच हातगाड्यांमुळे आधीच गर्दी असते. त्यातच यवतमाळ, महागाव, फुलसावंगी आदी मार्गांवरील खासगी ट्रॅव्हल्स बस स्थानकाच्या कंपाउंडलगत उभ्या करून प्रवासी घेत असल्याचे चित्र रोज पाहायला मिळते.

याशिवाय स्थानिक मार्गांवरील ऑटो रिक्षांची रांगही दिवसभर बसस्थानकासमोर लागलेली असते. बाहेरगावाहून येणाऱ्या तसेच पुण्यासह इतर शहरांकडे जाणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सही प्रवासी भरण्यासाठी रस्त्यावरच थांबत असल्याने बसस्थानकासमोरील परिसराला दिवसभर जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

या अनधिकृत थांब्यांमुळे एसटी चालकांना बस स्थानकात प्रवेश करताना मोठी अडचण येत असून अनेकदा किरकोळ अपघातही घडत आहेत. पादचारी, दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांनाही जीव मुठीत घेऊन या मार्गावरून प्रवास करावा लागत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

परिवहन महामंडळाकडून याबाबत वारंवार पोलिस प्रशासनाला पत्रव्यवहार करण्यात येत असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात वाहतूक शाखा आणि पोलिसांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

बसस्थानकाप्रमाणेच शहरातील विविध बसथांब्यांवरही खासगी वाहने व रिक्षांची बेकायदेशीर गर्दी वाढत असून त्यामुळे वाहतूक कोंडी आणि प्रवाशांची गैरसोय वाढत आहे. बसस्थानक परिसर अतिक्रमणमुक्त करून खासगी वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता अधिक जोर धरू लागली आहे.

# काळी दौ. आश्रम विद्यालयात 'सायबर सुरक्षा-नशामुक्त अभियान'

## विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल जीवनाचा संदेश

प्रतिनिधी २० जुलै

**महागाव :** विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्याबरोबरच व्यसनमुक्त जीवनाचा संदेश देण्यासाठी काळी दौ येथील अतहर मिर्झा वि.जा. भ.ज. माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम विद्यालयात 'सायबर सुरक्षा-नशामुक्त अभियान' अंतर्गत जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य एम. डी. खान होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस उपनिरीक्षक राहुल देशमुख व त्यांच्या पथकाने विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी ऑनलाइन फसवणूक, ओटीपी शेअर करण्याचे धोके, बनावट लिंकपासून बचाव, सोशल मीडिया खात्यांची सुरक्षितता, सायबर गुन्ह्यांच्या तक्रारीसाठी १९३० हेल्पलाईन व cybercrime.gov.in पोर्टलचा वापर, अभ्यासासाठी मोबाईलचा योग्य उपयोग तसेच महिला व मुलींच्या ऑनलाइन सुरक्षेबाबत



सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

पीएसआय राहुल देशमुख यांनी प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून विविध सायबर फसवणुकीचे प्रकार स्पष्ट करत, अनोळखी लिंकवर क्लिक न करण्याचे आणि कोणालाही ओटीपी न सांगण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसनही करण्यात आले.

यानंतर 'नशामुक्त भारत' या विषयावर व्यसनांचे दुष्परिणाम, तरुण पिढी व्यसनाधीन होण्याची कारणे आणि त्यातून मुक्त होण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. 'नशा मुक्त मी, नशा मुक्त घर, नशा मुक्त गाव आणि नशा मुक्त भारत' हा संदेश देत विद्यार्थ्यांकडून व्यसनमुक्तीची शपथ घेण्यात आली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य एम. डी. खान यांनी तंत्रज्ञानाचा सकारात्मक आणि जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. नगरधने यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता वाढल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# वीज आंदोलनानंतर सहाय्यक अभियंत्याची बदली

प्रतिनिधी २० जुलै

**उमरखेड :** ढाणकी शहरात तब्बल २४ तास वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर महावितरण कार्यालयासमोर नागरिकांनी केलेल्या आंदोलनानंतर सहाय्यक अभियंता राहुल नाखले यांची पुसद येथे बदली करण्यात आली आहे. या बदलीला आंदोलनाचे यश असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला असून महावितरणने नागरिकांच्या मागणीची दखल घेतल्याची प्रतिक्रिया विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शहरातील नागरिकांना रात्रभर अंधारात राहावे लागले. यामुळे विविध राजकीय पक्षांचे स्थानिक पदाधिकारी आणि नागरिकांनी महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.

आंदोलनकर्त्यांचा आणखी दावा असा आहे की, आंदोलनानंतर



सहाय्यक अभियंता राहुल नाखले यांनी काही आंदोलनकर्त्यांविरोधात अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत कारवाईची मागणी करणारा अर्ज दिला होता. तसेच हा अर्ज बिटरगाव पोलिस ठाण्याने स्वीकारला नसल्याचाही दावा करण्यात आला आहे. मात्र, या दाव्याबाबत अधिकृत पोलिस किंवा महावितरण प्रशासनाकडून स्वतंत्र पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, १६ जुलै रोजी शहर बंद व मोर्चा काढून संबंधित अधिकाऱ्याविरोधात कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले होते.

त्यानंतर १८ जुलै रोजी राहुल नाखले यांची पुसद येथे बदली झाल्याची माहिती समोर आली.

या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाळू पाटील चंद्रे, मनसे तालुकाध्यक्ष सादिक शेख, काँग्रेस शहराध्यक्ष गजानन मिटकरी, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक बाळाभाऊ योगेवार, युवासेना तालुकाध्यक्ष संभाजी गोरटकर, माजी प्रहार तालुकाध्यक्ष सय्यद, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष संबोधी गायकवाड, प्रशांत विनकरे आदींनी आंदोलनाची दखल घेतल्याबद्दल महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

### आंदोलनकर्त्यांची प्रतिक्रिया

- मनसेचे तालुकाध्यक्ष सादिक शेख म्हणाले, "ढाणकी व परिसरातील नागरिक वीज समस्येमुळे त्रस्त असताना आपल्या प्रश्नासाठी उचललेला आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केल्याने ढाणकीकरांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

# मोकाट जनावरे, कुत्रे आणि खड्डेमय रस्त्यांनी दिग्रसकर हैराण

## 'तिहेरी संकटाने दिग्रसकर त्रस्त'

- "समोर मोकाट जनावरे, मागे कुत्र्यांची दहशत आणि खाली खड्डेमय रस्ता" अशी परिस्थिती सध्या दिग्रस शहरात निर्माण झाली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या तिहेरी संकटावर तातडीने उपाययोजना करणे ही नगर परिषद प्रशासनासमोरील मोठी जबाबदारी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

प्रतिनिधी २० जुलै

**दिग्रस :** पावसाळ्याच्या सुरुवातीलाच दिग्रस शहरातील नागरिकांना मोकाट जनावरे, मोकाट कुत्रे आणि खड्डेमय रस्ते या तिहेरी समस्येचा सामना करावा लागत आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि गल्लीबोळांमध्ये वाढलेल्या या समस्यांमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन धोकादायक बनले असून, नगर परिषदेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

शहरातील अनेक ठिकाणी मोकाट जनावरे रस्त्याच्या मध्यभागी बसत असल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. त्याचबरोबर मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही कुत्रे आजारी अवस्थेत फिरताना दिसत असून त्यांच्या अंगावरील जखमांमुळे संसर्गाचा धोका निर्माण झाल्याची नागरिकांची तक्रार आहे. महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून जाताना कुत्र्यांच्या हल्ल्याची भीती सतावत आहे. रात्रीच्या वेळी चौकांमध्ये कुत्र्यांचे कळप बसत असल्याने वाहनचालकांसाठी अपघाताचा धोका वाढला आहे. दुसरीकडे, शहरातील प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पावसाच्या पाण्याने खड्डे भरल्यामुळे रस्त्याचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. पादचाऱ्यांनाही चिखल, साचलेले पाणी आणि खड्ड्यांमुळे मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सध्या शहरात नवीन पाईपलाईन व भूमिगत गटार योजनेची कामे सुरू असल्यामुळे नवीन रस्त्यांच्या कामाला विलंब होणार



असल्याची बाब नागरिक मान्य करत आहेत. मात्र, तोपर्यंत खड्डे बुजविणे, धोकादायक ठिकाणांची तात्पुरती दुरुस्ती करणे आणि वाहतुकीसाठी सुरक्षित व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. यासोबतच मोकाट जनावरांवर नियंत्रण, मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण, तसेच त्यांच्यावर नियंत्रणासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणी होत आहे. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक सुरक्षित आणि सुरळीत ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# विठ्ठलवाडीत निःशुल्क आरोग्य शिबिर

प्रतिनिधी २० जुलै

**वणी :** वेकोली वणी नॉर्थ क्षेत्राच्या सीएसआर उपक्रमांतर्गत आणि आमदार संजय देरकर यांच्या पुढाकारातून विठ्ठलवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या निःशुल्क सर्वसाधारण आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरात सुमारे १७० नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध आजारांचे निदान करून आवश्यक औषधांचे विनामूल्य वितरण केले. तसेच नियमित आरोग्य तपासणी, संतुलित जीवनशैली आणि आजारांपासून बचाव याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

# गांजासह दोघे जेरबंद, एक फरार

प्रतिनिधी २० जुलै

**उमरखेड :** पोफाळी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करत ७ किलो ३४५ ग्रॅम गांजासह दोन आरोपींना अटक केली असून एक आरोपी फरार झाला आहे. या कारवाईत गांजा आणि मोटारसायकल असा एकूण २ लाख ६ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोफाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिळोणा येथील रोशनी ढाबा परिसरात १९ जुलै रोजी ही कारवाई करण्यात आली. पुसद-उमरखेड मार्गावरून तीन जण मोटारसायकलवर गांजाची वाहतूक करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोफाळी पोलिसांनी सापळा रचून संशयितांना अडविले. अंगझडतीदरम्यान तुषार राजू पाईकराव (२३, रा. मंगरूळपीर) व रोशनी विजय चव्हाण (२०, रा. मंगरूळपीर) यांच्या ताब्यातून सुमारे ७ किलो ३४५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. या गांजाची अंदाजे किंमत १ लाख ४६ हजार ९०० रुपये असून, ६० हजार रुपयांची मोटारसायकलही जप्त करण्यात आली. असा एकूण २ लाख ६ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. या प्रकरणातील तिसरा आरोपी करण मोहन जाधव (३२, रा. हनवतखेडा, ता. मालेगाव, जि. वाशिम) हा घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा पोलीस शोध घेत आहेत. या प्रकरणी पोफाळी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

सोमवार, दि. २० जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# अमरावती येथील गॅलेक्सी स्पोर्ट अकॅडमीचे आ.रवि राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनित राणा यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी २० जुलै

**अमरावती :-** अमरावती शहरातील युवा खेळाडूंना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या एम.आय. डी.सी परीसरातील लाली लॉन जवळील क्रिकेट व फुटबॉल टर्फ ग्राऊंड गॅलेक्सी स्पोर्ट अकॅडमीचे उद्घाटन आमदार रवि राणा व भाजपा नेत्या, माजी खासदार सौ. नवनित राणा यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी, युवा खेळाडू, पालक, नागरिक व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते फित कापून तसेच पूजन करून अकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर अकॅडमीतील विविध क्रीडा सुविधींची पाहणी करण्यात आली. क्रिकेटसह विविध खेळांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक सुविधा पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले व अकॅडमीच्या संचालकांचे अभिनंदन केले. उद्घाटनानंतर आ. रवि राणा व सौ. नवनित राणा यांनी युवा खेळाडूंसोबत मैदानात उतरून मैत्रीपूर्ण क्रिकेटचा आनंद घेतला. राणा दाम्पत्याने फलंदाजी व गोलंदाजी करत खेळाडूंशी संवाद साधला. त्यांच्या या सहभागामुळे उपस्थित युवकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला. यावेळी मार्गदर्शन करताना आ. रवि राणा म्हणाले की, “आजच्या आधुनिक युगात युवकांनी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी न जाता खेळाला प्राधान्य द्यावे. नियमित खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते, मानसिक स्वास्थ्य चांगले राहते तसेच शिस्त, संयम, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होतात. अमरावतीतील अधिकाधिक युवकांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपले नाव उज्ज्वल करावे. अशा दर्जेदार क्रीडा सुविधा उभारल्या जात असल्याने ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.” कार्यक्रमादरम्यान उपस्थित युवकांनीही क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी अशा उपक्रमांचे स्वागत केले. गॅलेक्सी स्पोर्ट अकॅडमीच्या माध्यमातून भावी काळात अनेक गुणवंत खेळाडू घडतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी नगरसेवक महेश मुलचंदानी, नगरसेविका नंदा सावदे, संचालक डॉ.आशिष डगवार, डॉ.सोनाली डगवार, आदित्य डगवार, भाजपा पदाधिकारी व उपाध्यक्ष पॉवर लिफटीग फेडरेशन ऑफ इंडीया सुनिल खराटे, डॉ.दिनेश वाघाडे, विनय तन्ना, मुकेश वासेवाय व असंख्य खेळाडु उपस्थित होते.

## उद्घाटनानंतर राणा दाम्पत्याने घेतला मैत्रीपूर्ण क्रिकेटचा आनंद



# कलाविष्कार' वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

## नृत्य कला केंद्राचे उपक्रम

प्रतिनिधी २० जुलै

**अमरावती:** अविष्कार नृत्य कला केंद्र पाचव्या वर्षात पदार्पण करत असल्याने ‘कलाविष्कार’ वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे 25 जूलै रोजी दुपारी 3 वाजता संचालिका अदिती मेहता-तोंडगावकर यांनी केले आहे. हा कार्यक्रम नृत्य केंद्रातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजित करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्यासाठी आणि गुरुपौर्णिमा तसेच आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचा आनंद भक्तिमय वातावरणात साजरा करण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे. कार्यक्रमात कथ्थक, लोकनृत्य (फोक डान्स), सेमी-क्लासिकल नृत्य, अभंग, गजर, पसायदान आणि वारकरी परंपरेवर आधारित भावपूर्ण नृत्य-नाटिकेचे सादरीकरण करण्यात येणार आहे.



गुरु-शिष्य परंपरेचा गौरव, संतपरंपरेतील भक्तिचा संदेश आणि भारतीय संस्कृतीचे जतन करत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, आत्मविश्वास वाढविणे व कला, संस्कार आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडविणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. कित्येक वर्षांची कलासाधना, गुरूंचे आशीर्वाद आणि वारीची भक्ती — यांचा सुंदर संगम राहणार आहे. कार्यक्रमामध्ये वय वर्षे ४ पासून ते ६५ पर्यंतच्या सर्व वयोगटातील विद्यार्थी-विद्यार्थिनीं व त्यांचे पालक या सर्वांचे भावपूर्ण आकर्षक सादरीकरण होणार असून, विविध पिढ्यांना एकाच सांस्कृतिक मंचावर एकत्र आणण्याचा हा एक सुंदर प्रयत्न राहणार आहे.तरी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाच्या आयोजक आदिती मेहता यांनी केले आहे.

# सुपरफास्ट शिवाई व शिवशाही बसथांब्याची मागणी

## शिवसेना युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांची परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे मागणी

प्रतिनिधी २० जुलै

**अमरावती :** शिवसेना युवासेना, अमरावती जिल्ह्याचे उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे सर्वसामान्य प्रवाशांच्या हिताच्या विविध महत्त्वाच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. यामध्ये चांदूर रेल्वे – नांदगाव खंडेश्वर – मांगरूळ चव्हाळा – कारंजा – बार्शिटाकळी– अकोला – शेगाव या मार्गावर नवीन नियमित एस.टी. बससेवा तातडीने सुरू करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे.



सामना करावा लागत आहे. तसेच श्री. क्षेत्र शेगाव येथे श्री. संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी तालुक्यातून एकही थेट एस.टी. बस उपलब्ध नसल्यामुळे हजारो भाविकांना अनेक वेळा बस बदलून प्रवास करावा लागतो. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत असून भाविकांची मोठी गैरसोय होत सर्व सुपरफास्ट एस.टी. बसांना अधिकृत थांबा देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या ठिकाणाहून दररोज विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, व्यापारी, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करतात. मात्र अधिकृत बसथांबा नसल्याने प्रवाशांना लांब अंतरावर जाऊन बस पकडावी लागते किंवा खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. या दोन्ही मागण्या मंजूर झाल्यास हजारो प्रवाशांची दैनंदिन गैरसोय दूर होईल, शेगावला जाणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळेल, तसेच एस.टी. महामंडळाच्या प्रवासीसंख्येत व उत्पन्नातही वाढ होईल, असा विश्वास शुभम परळीकर यांनी व्यक्त केला. या निवेदनांच्या प्रती संबंधित एमएसआरटीसी अधिकारी, अमरावती विभाग तसेच संबंधित लोकप्रतिनिधींनाही देण्यात आल्या असून परिवहन मंत्र्यांनी या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शुभम परळीकर यांनी व्यक्त केली.

# गोरक्षण स्थळावर हिरव्या चाऱ्याचे दान

## देविदास वाळकेंनी साधली जन्मदिवसाला गो - पूजा

प्रतिनिधी २० जुलै

**दर्यापूर :** आपल्या हसत मुख चेहऱ्याने संपूर्ण दर्यापूर - अंजनगाव ( सुर्जी ) परिसरात परिचित असलेले देविदास पाटील वाळके यांनी आपल्या एकष्ट्व्या जन्मदिवसाला हिरव्या चाऱ्याचे दान करून गो पूजा साधली . दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर तीन गाडी हिरवा चारा संपूर्ण स्वखर्चाने अर्पण करून त्यांनी या कार्याची पूर्तता केली . संस्थेचे संस्थापक संचालक प्रा गजानन भारसाकळे यांनी या सेवेत स्वतः शारीरिक सहभाग



नोंदवित हिरव्या चाऱ्याची कुटी करून गाय वासरांना दिली . दिवसभऱ्याच्या सेवेनंतर दुपार सत्रात देविदास वाळके यांनी गोपूजन ही केले . या दानकार्याच्या कृतज्ञतेसाठी संस्थेच्या वतीने गोरक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा माहुली ( धांडे) गावाचे माजी सरपंच विजय पाटील धुमाळे ( साखरे ) यांनी देविदास वाळके यांचा शाल श्रीफळ देऊन गौरव केला . प्रत्येकाने जन्मदिवसाला विधायक कार्य करूनच हा आनंद साजरा करावा असे प्रा गजानन भारसाकळे यांनी या प्रसंगी प्रतिपादित केले . राजकारणात सक्रीय असतांना सुद्धा आपले समाजसेवा कार्याचे सातत्य आयुष्याच्या चढउतारात सुद्धा संतुलीत ठेवणारे देविदासभाऊ यांचा आदर्श इतरांनी घ्यावा याचाही आवर्जून उल्लेख प्रा भारसाकळे यांनी या गौरव प्रसंगी केला . सायंकाळी पिठाचे उंडे अर्पण करून तथा तुळशी जवळ दिवा लावून या कार्याची सांगता करण्यात आली . संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे यांनी सर्वांचे यथोचित आदरतिथ्य केले . दैनंदीन गोसेवक अंकुश घरडे, श्रीकृष्ण पोटे व ज्ञानेश्वर गवई यांचे सह विनोद श्रीरंगजी भारसाकळे ( बेलोरा ) व आशिष एकनाथ ठाकरे ( माहुली - धांडे) यांनी या प्रसंगी श्रमदान केले .

# आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांची चिखलदरा कन्या आश्रमशाळा तसेच मुलींच्या वसतिगृहास भेट



प्रतिनिधी २० जुलै

**अमरावती :** चिखलदरा येथे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी नुकतीच भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी चिखलदरा दौऱ्यादरम्यान शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा तसेच टेंब्रूसोंडा मुलींच्या वसतिगृहास येथे भेट दिली. यावेळी भेटीदरम्यान त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींशी संवाद साधत महाविद्यालय व वसतिगृहाची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच शिक्षणाचा दर्जा, वसतिगृहातील सुविधा आणि विद्यार्थिनींना अधिक चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी आमदार केवलराम काळे, अपर आयुक्त संदीप गोलाइत, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, मुख्याध्यापक पुंडकर, शिक्षकवृंद तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# वलगावात दोन तरुणांची निर्घृण हत्या

## पुन्हा शहर हादरले

प्रतिनिधी २० जुलै

**अमरावती :** अमरावती पोलीस आयुक्तालयाअंतर्गत वलगाव येथील घटना अमरावती : पोलीस आयुक्तालयातील वलगाव पोलीस ठाणे अंतर्गत वल गाव येथील बसस्थानकासमोरील मंदिरापाशी रविवार ११ वाजताच्या सुमारास काही अज्ञात आरोपpiंनी दोन तरुणांवर धारदार शस्त्राने बेछूट वार करून त्यांची निर्घृण हत्या केली आणि तिथून पळ काढला. या दुहेरी हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात दहशत पसरली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. किरकोळ वादातून हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला असून या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयात मोठी गर्दी केल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. सध्या वलगाव पोलीस या प्रकरणाचा कसून शोध घेत असून परिसरात बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



### पोलिसांसमोर आव्हान

वलगावातील या दुहेरी हत्याकांडाने पोलीस प्रशासनाची झोप उडवली आहे. ऐन रात्री सार्वजनिक ठिकाणी भरचौकात झालेल्या या गुन्ह्यामुळे कायद्याचा धाक उरला नाही काय?असा सवाल सामान्य लोक विचारत आहेत. पोलीस आता सीसीटीव्ही आणि गुप्त माहितीच्या आधारे फरार आरोपींचा कसून शोध घेत असून रात्री उशिरा या प्रकरणी आरोपींनाताब्यात घेतल्याची माहिती आहे. पुढील तपास वलगाव पोलीस व वरिष्ठ पोलीस अधिकारी करीत आहेत.

रविवार रात्रीच्या दरम्यान संजोग विकार जोशी (वय २४, रा. वलगाव) आणि रितिक राजू उर्फ बंडू पंडित (वय २५, रा. महाजनपुरा, अमरावती)



मृतक

हे दोन्ही युवक वलगावच्या जुन्या बसस्थानकाजवळ थांबले होते. तिथे काही अनोळखी इसमांसोबत त्यांचा कोणत्यातरी कारणावरून कडाक्याचा वाद झाला.

हा वाद इतका विकोपाला गेला की हल्लेखोरांनी स्वतः जवळील तीक्ष्ण हत्यारे काढून या दोन तरुणांवर सपासप वार करायला सुरुवात केली. अचानक झालेल्या या भयंकर हल्ल्यात दोघेही रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळले. त्यानंतर आरोपींनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन तिथून पळ काढला.

# युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## शिंगणापूर फाटा येथे सुपरफास्ट व शिवशाही बसांना अधिकृत थांबा

प्रतिनिधी २० जुलै

**अमरावती**अमरावती–यवतमाळ मार्गावरील शिंगणापूर फाटा येथे प्रवाशांच्या सोयीसाठी सर्व सुपरफास्ट, शिवशाही व शिवाई बसांना अधिकृत थांबा देण्याची मागणी युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत अमरावती विभाग नियंत्रकांनी संबंधित आदेश जारी करून शिंगणापूर फाटा येथे सर्व संबंधित बसांना अधिकृत थांबा देण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी शिंगणापूर परिसरातील नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व प्रवाशांना बस थांबा नसल्यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल घेत शुभम परळीकर यांनी एसटी प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करून सातत्याने पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने १८ जुलै २०२६ रोजी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, अमरावती यांनी आदेश काढून अमरावती विभागातील सर्व प्रकारच्या बसांना शिंगणापूर फाटा येथे थांबा देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच सर्व चालक व वाहकांनी या ठिकाणी प्रवाशांना चढ-उतार करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून आदेशाचे काटेकोर पालन करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे शिंगणापूर व परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनचीमागणीपूर्णझालीअसून प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.याबद्दलस्थानिकनागरिकांनी युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकरयांचेआभारमानतसमाधान व्यक्तकेलेआहे.

# मोसंबी बागायतदारांना जंगली पोपटांच्या उपद्रवामुळे लाखोंचा फटका बसण्याची शक्यता

**वरुड :-** वरुड तालुक्यातील बेलोरा, आलोडा, पळसवाडा, नांदगाव, हातूर्णा येथील शेतकऱ्यांनी मुख्य नगदी पिक म्हणुन मागील काही वर्षापासून संत्रा सोडुन मोसंबी पिकाची निवड केली. भरवस्याचे पिक म्हणुन चांगले उत्पन्न हाती येईल या आशेने परिसरातील फळबागांचे लागवडीखालील क्षेत्र वाढत गेले. परिणामी कापुस, तुर, सोयाबीन या सारखे पिक नाममात्र स्वरूपात शेतकरी घेत आहे. या वर्षी जंगली पोपटांचे लाखोच्या संख्येत थवेच्या थवे परिसरात मुक्कामी राहून परिपक्व मोसंबी फळ फस्त करीत असुन प्रत्येक झाडाखाली गळून पडलेल्या फळांची संख्या



५० ते १०० असुन, झाडाखाली फळांचा थर दिसून येत आहे.

परिसरातील शेतकरी पहाटे पासुन शेतात कुणी फटाके तर कुणी डफ वाजवून, कुणी रेकॉर्ड वर ध्वनीफीत वाजवून, असे नवनवीन प्रयोग करून शेताची रखवाली करतांना दिसत असुन, तरीही त्यांचा उपद्रव कमी होतांना दिसत नाही. यामुळे शेतीच्या अन्य कामावर परिणाम होत असुन बाकीची शेतीची कामे शेतकरी करू शकत नाही. पुर्ण वेळ शेतात राखवालीचे काम करूनही हाती काही लागेल याची शास्वती नाही. आधीच शासनाच्या उदासीन सुलतानी धोरणामुळे आणि महागडी संसाधने, अस्थिर बाजारभाव, वाढता उत्पादन खर्च, निसर्गाचा लहरीपणामुळे शेतकरी मेटाकुटीस आला असुन त्यात हे नवीन संकट शेतकऱ्यांना भेडसावत आहे.


असेच नुकसान होत राहिले तर शेतकरी पुढील हंगाम तर सोडा पण कुटुंबाचा गाडा, मुलाचे शिक्षण या सर्वावर याचा परिणाम होणार आहे.

# फेज-1 आणि फेज-2 प्रमाणे काम न करता संपूर्ण सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल म्हणून जबाबदारी सांभाळा - आ. सुलभा खोडके

## सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील आरोग्य सेवा, भौतिक सुविधा ,स्वच्छता व्यवस्था व देखभाल दुरुस्तीच्या विविध कामांचा घेतला आढावा

प्रतिनिधी २० जुलै

**अमरावती :** अमरावती येथील सुपरस्पेशालिटीमध्येजटिलवदुर्धर आजारांच्यासर्वअतिदक्षतेच्यासेवा -सुविधा उपलब्ध असून त्यासाठी लागणारे मनुष्यबळ सुद्धा उपलब्ध आहे. तसेच ज्या विभागांमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता होती, त्याठिकाणीसुद्धाबाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळपुरविण्यातआलेआहेअसे असतांना मात्र केवळ नियोजनाचा अभावआणिबेशिस्तपणामुळेसुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची दुरावस्था होतांना दिसत आहे. यात सुधारणा आवश्यकअसूनआरोग्यकर्मचारीव



कंत्राटीकामगारांनीसुपरस्पेशालिटी हॉस्पिटल मधील फेज-१ आणि फेज-२ युनिट प्रमाणे काम न करता संपूर्ण हॉस्पिटल म्हणून संबंधित कामांची जबाबदारी सांभाळत अमरावतीचेहेआरोग्यवैभवअधिक बळकट व प्रभावीपणे पुढे नेण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार -सौ.सुलभाताईखोडकेयांनीकेले. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील रुग्णांना आरोग्य संजीवनी बहाल करणाऱ्या अमरावती स्थित सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या आरोग्य सुविधा ,स्वच्छता व्यवस्था व देखभाल दुरुस्तीच्या विविध कामांचा आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी यावेळी आढावा घेतला. यावेळी विधान परिषद आमदार - संजय खोडके तसेच सुपर स्पेशालीटी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक -डॉ.अमोलनरोटेआदीउपस्थितहोते. आढावा बैठकीदरम्यान आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी रुग्णालयातील स्वच्छता, वॉर्डमधील सुविधा, औषध उपलब्धता, कर्मचारी उपस्थिती आणिरुग्णांनादिल्याजाणाऱ्यासर्व सेवा-सुविधांची माहिती जाणून घेतली. रुग्णांना दर्जेदार व तत्पर आरोग्य सेवा मिळणे ही रुग्णालय प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. रुग्णांना जितक्या आरोग्य सेवा महत्वाच्या आहेत ,तितक्याच रुग्णालयातील पाणी पुरवठा , विद्युत सेवा, स्वच्छता व्यवस्था, सुरक्षाव्यवस्था,यासारख्याभौतिक वपायाभूतसुविधासुद्धातितक्याच महत्वाच्या आहे. हॉस्पिटलमधील स्वच्छतेच्या कामांची गुणवत्ता, शौचालयांचीस्वच्छता,इमारतीची देखभाल, दुरुस्तीची प्रलंबित कामे तसेचरुग्णवत्यांच्यानातेवाईकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मूलभूत सुविधा अधिक सक्षमपणे राबविण्यात यावीत, अशा सुचना आमदार सुलभा खोडके यांनी केल्यात.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार, दि. २० जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची लुबाडणूक...
शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अतिक्रमण
* जमीन तव्यात घ्या, चौकशी करून गुन्हे दाखल करा;अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांचा इशारा
शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण !
* वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लूटले, आता पुन्हा बांधकाम करीत सुटले
अतिक्रमण
गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात !
गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात

## शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण...

# वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची फसवणूक !

### * चौकशी करून गुन्हे दाखल करा ; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील आर. ए. कॉलेज यांनी शासनाच्या सिटनंबर २७/२३ या जागेवर यु.जी. एस.सि. योजनेअंतर्गत अनुदान घेवून अवैधरित्या मुलाच्या वस्तीगृहाचे बांधकाम केले. व १०२८१ चौ.मि. जागा अनाधिकृतपणे हडप केली. या सर्वांच्या चुकीच्या कामाची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे व जागा व इमारत सरकारच्या ताब्यात घ्यावी. यासाठी वेळोवेळी आंदोलने, उपोषणे करूनही न्याय मिळाला नाही. तत्कालीन आ.स्व. विनायक मेटे यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा स्मरण पत्र देवून चौकशी करण्याची मागणी पुन्हा स्मरण पत्राचे निवेदन देवून सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी केली आहे. अन्यथा पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. तर या प्रकरणी जनहित याचीका दाखल करून न्यायालयातही न्याय मागणार असल्याचे देव्हडे यांनी सांगितले.





निवेदनानुसार स्थानिक राजस्थान आर्य शिक्षण संस्था वाशीम यांचे अध्यक्ष / सचिव तथा संचालक मंडळाने शासनाची दिशाभुल करून खोटे दस्ताऐवज तयार केले. खोट्या दस्ताऐवजाच्या आधारे मुलाच्या वस्तीगृहाचे बांधकाम करण्यासाठी यु.जी.एस.सी. मार्फत सन २०१० मध्ये १.५० कोटी रूपये अनुदान लाटले. व बांधकाम केले. सदर बांधकाम ज्या जागेवर केलेत ती जागा सिट क्रमांक २७/२३ १०२८१ चौ.मि. ही शासनाची असून त्यावर सुध्दा अतिक्रमण केलेले आहेत. असे असतांना ज्या उद्देशासाठी शासनाचे अनुदान घेतले आहे व जागा हडप केलेली आहे हे मुलीचे वस्तीगृह बांधकाम केले तेव्हापासून आजपर्यंत मुलीच्या वास्तव्यासाठी वापरात नसुन त्याचा गैरवापर आर्य शिक्षण संस्था करीत आहे. यापुर्वीही तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी २०१३ मध्ये तहसीलदारांना अतिक्रमणाबाबत सुचना देवून योग्यती कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र संबंधित संस्थान चालकांनी आर्थिक देवाण घेवाण करून ही कारवाई थांबविली होती. त्यानंतर वारंवार निवेदन देवून आंदोलन केले. मात्र अद्यापही कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे पुन्हा १४ जुलै २०२६ रोजी स्मरण पत्राचे निवेदन देवून कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

या निवेदनाची प्रतिलिपी महसुल मंत्री चंद्रकांत बानकुळे यांना पाठविली आहे. त्यामुळे आजपर्यंत संस्थेवर कोणतीच कारवाई न झाल्याने संबंधितांची चौकशी करून कारवाई करा अन्यथा पुन्हा धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी दिला आहे.

### न्यायालयीन कामकाजाच्या नावाखाली दिशाभूल

हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून काही करू शकत नाही अशा प्रकारे शासकीय अधिकारी सांगून दिशाभूल करीत असल्याचा आरोप सुभाष देव्हडे पाटील यांनी केला. या प्रकरणी न्यायालयाने कोणताही स्थगिती दिली नसून हे प्रकरण फक्त न्यायालयात दाखल आहे. यावर कोणत्याही प्रकारची सुनावनी व स्थगिती झाली नाही. शासनाची करोडो रूपयाची जाग हडप करून अधिकारी व पुढारी दिशाभूल करत असल्याचा आरोप देव्हडे पाटील यांनी केला आहे.

### तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशीचे पत्र

या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी महसुल विभागासह जिल्हा पोलिस अधिक्षकांना पत्र देवून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी असे पत्र दिले होते. १३ वर्षानंतरही या प्रकरणात कोणतीही कारवाई न झाल्याने पुन्हा चौकशी करण्याचे मागणी देवढे पाटील यांनी केली आहे.

### अधिकारी व पुढाऱ्याची मिलीभगत

शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून वसतीगृहाच्या नावावर कोट्यवधीचे अनुदान घेवून शासनाची व जनतेची फसवणूक करणाऱ्या आर्य शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची व अधिकाऱ्यांची मिलीभगत असून यामध्ये कोट्यवधीची फसवणूक झाली आहे. शासकीय जागा असूनही अधिकारी गुन्हे दाखल करून संचालक मंडळावर कारवाई करीत नाही. शिवाय जागाही ताब्यात घेत नाहीत. त्यामुळे अधिकारी व पुढाऱ्याची मिलीभगत असल्याचे दिसून येते. या प्रकरणी संबंधीत संचालकांवर अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी सुभाष देव्हडे पाटील यांनी केली आहे.

---

## थोडक्यात

### मूकबधिर निवासी विद्यालय व वृद्धाश्रमात सामाजिक उपक्रम साजरा



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

परमहंस भगवंत माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, मंगरूळपीर, जि. वाशिम संचलित मूकबधिर निवासी विद्यालय, दिव्यांग निवासी विद्यालय व चित्र ऋषी महाराज वृद्धाश्रम, मंगरूळपीर जिल्हा वाशिम येथे हर्षवर्धन विरेंद्र हिरेकर याचा दुसरा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

हर्षवर्धनचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. चित्र ऋषी महाराज वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी संस्थेच्या परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.यानंतर हर्षवर्धनचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. चित्र ऋषी महाराज वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी संस्थेच्या परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. या सर्व उपक्रमांतून वाढदिवस हा केवळ आनंदाचा वैयक्तिक क्षण न राहता तो समाजोपयोगी कार्याशी जोडला जाऊ शकतो, हा महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांना मदत, ज्येष्ठ नागरिकांप्रती आपुलकी, तसेच पर्यावरण रक्षणाची जाणीव या तिन्ही गोष्टींचा सुंदर संगम या कार्यक्रमातून दिसून आला. अशा उपक्रमांमुळे लहान वयातच समाजाभिमुख विचारांची रुजवणूक होते आणि इतरांनाही मदतीसाठी पुढे येण्याची प्रेरणा मिळते.कार्यक्रमाची सांगता सर्व विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, शिक्षक, कर्मचारी व उपस्थित मान्यवर यांच्या सामूहिक भोजनाने झाली. शेवटी सर्वांनी एकत्रित समूह छायाचित्र काढून या सामाजिक उपक्रमाची संस्मरणीय आठवण जपली.या कार्यक्रमास विरेंद्र हिरेकर (सहायक कक्ष अधिकारी), सीमा विरेंद्र हिरेकर (सहायक कक्ष अधिकारी), सतीश हिरेकर (तुरुंग अधीक्षक, मोर्शी) तसेच हिरेकर परिवार, बाळासाहेब इंगोले, युवराज सावळे, प्रशांत बेलखेडे (पोलीस उपनिरीक्षक) व बेलखेडे परिवार, प्रवीण कानकिरड, मंगेश धानोरकर, ललित खाडे, तातेश मनवर, संतोष उंद्रे अरविंद पडघन, रामजी नवघरे, विष्णू धनगर व इतर मान्यवर उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष राठोड सर, मुख्याध्यापक अभिजीत राठोड, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वजीत भगत यांनी केले. उपस्थितांनी हर्षवर्धनला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला.

### निधन वार्ता...



**सचिन गवई**

**रिसोड :** आपणास कळविण्यास अत्यंत दु:ख होते की एकता नगर येथील सचिन श्रावण गवई यांचे आज रात्री १२.०० वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले तरी त्यांचा अंत्यविधी चां कार्यक्रम दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी १०. वाजता रिसोड येथील मालेगाव नाका येथील स्मशानभुमित राहिल. त्यांच्या पश्चात आई, बाबा, बहीण, भाऊ सुनिल गवई मोठा परिवार आहे .

---

## अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराचा छंद...

# आर्थिक देवाण-घेवाणसाठी ‘क्युआस’ मशीनी पाडल्या बंद !




### * नागरिकांना आर्थिक भुर्दंड * भ्रष्टाचारासाठी काहीही * बंद मिशनमुळे नागरिकांची तारांबळ



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हाधिकारी कार्यालयासह प्रत्येक तहसील कार्यालयात नागरिकांना वेळेवर कागदपत्र मिळावे यासाठी क्युआस मशिनही बसविण्यात आल्या आहेत. परंतु या मशिनमुळे भूमिअभिलेख व तहसील कार्यालयातील अधिकाऱ्याचे आर्थिक आवक कमी झाली. नागरिकांचे कामे सुलभ होवू लागले. मात्र नागरिकांना त्रास देण्याचा वसा घेतलेल्या विघ्नसंतोषी कर्मचाऱ्यांनी मिशनच बंद पाडल्याचा प्रकार समोर आला आहे. यावरून पैशासाठी अधिकारी व कर्मचारी काहीही करतात.

जिल्ह्यातील तहसील कार्यालयातील क्यूआस मशीन बंद पडल्याने तालुक्यातील नागरिकांना अडचणीला सामोरे जात कार्यालयातील अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांची मनधरणी करावी लागत असून दिवसभर या विभागाच्या दारात गर्दी दिसून येते आहे. मनधरणी करूनही पैसे दिवूनही अधिकारी व कर्मचारी अगावू पैशाची मागणी करत आहेत. नागरिकांना कोणत्याही वेळी लागणारे सातबारा, कोतवाल बुकाची नक्कल, फेरफार, आठ अ आदी कागदपत्रे ताबडतोब मिळावेत या साठी जिल्हाधिकारी यांच्या प्रयत्नाने जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात क्यूआस मशीन (ए टि डि एम) बसवण्यात आले . याचा फायदा नागरिकांना होत असे. या मशीन मुळे अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यावर ताण कमी झाला होता. मात्र गैरमार्गाने मिळणारा पैसाही बंद झाला होता. नागरिकांना त्रास देण्याची सवय असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हे पाहविल्या गेले नाही. त्यातील काही कर्मचाऱ्यांनी बुध्दी लढवून जिल्ह्यातील मशीन बंद पाडल्या आहेत.



मशीन बंद असल्यामुळे अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी पुन्हा नागरिकांकडून कागदपत्रासाठी वसूली अभियांन सुरू केले आहे. या मशीनमुळे नागरिकांच्याही पैशाची व वेळेची बचत होत असे परंतु गेल्या काही वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयासह तहसील कार्यालयातील ही मशीन बंद झाल्याने नागरिकांची अडचण होत आहे. फेरफार, कोतवाल बुकाची नक्कल आदी कागदपत्र मिळवण्यासठी तीन ते सात दिवस लागत आहेत. तसेच नागरिकांचा वेळ व पैसाही जास्तीचा खर्चल्या जात आहे. कागदपत्रे लवकर मिळवण्यासाठी ‘चिरीमिरी’ची देवाण घेवाण करावी लागते अशी चर्चा नागरिकात आहे.

तरी संबंधितांनी यामशीनच्या दुरुस्तीकडे लक्ष्य देऊन ही मशीन सुरू करून नागरिकांचा त्रास कमी करावा अशी मागणी नागरिकांना मधून होत आहे. भूमीअभिलेख कार्यालयात फेरफार नकल यासाठी सर्वसामान्यांना त्रास सहन करावा लागत असून वारसा हक्काच्या नोंदीसाठी वर्षवर्ष चकरा माराव्या लागत आहेत.

### बंद पडलेल्या एटीडीएम मशीन सुरू करा - बंडू शिंदे

वाशीम : शेतकरी व सर्वसामान्य नागरीकांना सरकारी व खाजगी कामासाठी लागणारे सातबारा, आठ अ यासह इतर कागदपत्रे सहजगत्या मिळावी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात सुरु केलेली संगणकीकृत एटीडीएम मशीन यंत्रणा आजघडीला विविध कारणामुळे गेल्या काही वर्षापासून बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरीकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून ही कागदपत्रे मिळत नसल्यामुळे त्यांची इतर कामे रखडली आहेत. सदर एटीडीएम मशीन त्वरीत सुरु करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी सामाजीक कार्यकर्ते बंडु शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देवून केली आहे.

निवेदनात शिंदे यांनी नमूद केले आहे की, डिजीटल सातबारा, आठ अ चे जुने व नवीन नमुने त्वरीत मिळण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरामध्ये संगणकीकृत एटीडीएम मशीन लावल्या आहेत. काही दिवस ह्या मशीनी सुरु होत्या. परंतु गेल्या काही महिन्यापासून काही मशिनी बंद, बिघडलेल्या किंवा कोरोना संसर्ग होवू नये म्हणून बंद अवस्थेत आहेत.

सदर मशीन बंद असल्यामुळे विविध कागदपत्रे काढण्यासाठी शेतकरी व सर्वसामान्य नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधीतांना शासकीय कामासाठी लागणारी जुनी व नविन कागदपत्रे काढता येत नाहीत. सर्वसामान्यांना होणारा त्रास पाहता संबंधीत ठिकाणी असलेल्या ह्या एटीडीएम मशीनी त्वरीत सुरु करावी अशी मागणी शिंदे यांनी निवेदनाव्दारे प्रशासनाला केली आहे.

---

## भगवंता, काय लावली चिंता, पाऊस येवू दे..!

# पावसासाठी भगवंताकडे साकडे !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**धोंडी धोंडी पाणी दे..**
**हलकी हलकी ज्वारी दे..**
**धोंडीचं पाणी मोठ हिवसं..**
**भगवंता काय लावली चिंता**
**पाऊस येवू दे..!**



पावसाने जिल्ह्यात हजेरी लावली त्यानंतर शेतकऱ्यांनी छातीला माती लावून पेरण्या केल्या मात्र, आता आठ दिवसापासून पावसाने दडी मारल्यामुळे जिल्ह्यातील बळीराजा चिंतातूर झाला आहे. पावसासाठी बळीराजाने भगवंताकडे साकडे घालायला सुरूवात केली आहे.

यावर्षी जिल्ह्यातील काही भागात रोहिणी नक्षत्रात अवकाळी पाऊस आला होता. त्यामुळे गत वर्षी प्रमाणे याही वर्षी मृगनक्षत्रात पावसाच्या सरी येतील. या अपेक्षेने शेतकऱ्यांनी पेरणी पूर्वीचे सर्व कामे पुर्ण करुन घेतली.जिल्ह्यामध्ये बियाणे व रासायणिक खताची टंचाई असतांना देखील शेतकऱ्यांनी आर्थिक तडजोड करुन पेरणी साठी अव्वाच्या सव्वा भावात बियाणे व रासायनिक खताची खरेदी केली.मात्र पावसाने शेतकऱ्यांच्या स्वप्नावर पाणी फिरविले. मृग नक्षत्र कोरडाच गेला त्यानंतर आलेल्या पावसाने शेतकऱ्यांनी पेरणी केली. मात्र, पुन्हा पावसाने दडी मारल्यामुळे पावसासाठी शेतकऱ्यांनी भगवंताकडे साकडे घातले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. त्यामुळे आता ‘‘ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा’’ अशी पावसालाही आमिष दाखविण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.



धोंडी धोंडी पाणी दे..!

### मराठी विषयात पीएच.डी.; डॉ. हर्षा अजबे-पसारकर यांचे यश

**वाशीम :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने डॉ. हर्षा अजबे-पसारकर यांना मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांनी वाशीम येथील राजस्थान आर्य कला महाविद्यालयाच्या पीएच.डी. संशोधन केंद्रातून 'प्रा. डॉ. शे. दे. पसारकर : व्यक्ती आणि वांग्मय' या विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधनासाठी त्यांना प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर व प्रा. डॉ. विजय जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे, या संशोधन केंद्रातून मराठी विषयात पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या त्या पहिल्या विद्यार्थीनी ठरल्या आहेत.



डॉ. हर्षाराणी अजबे-पसारकर या विठाबाई पसारकर विद्यामंदिर, केकतउमरा येथील मुख्याध्यापिका असून, शिक्षणाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. लोकमत सखी मंच व सकाळच्या तनिष्का उपक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि स्वच्छता जनजागृतीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या कार्याबद्दल त्यांचा माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरवही करण्यात आला होता.आपल्या यशाचे श्रेय त्यांनी मार्गदर्शक प्रा. डॉ. विजय जाधव, ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे, विभूती वैभव मासिकाच्या संपादिका उषा पसारकर, पती अविनाश पसारकर तसेच कुटुंबीयांना दिले आहे. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा होणार अधिक सक्षम !

## आराखड्यानुसार खर्च केला जाणार निधी!

प्रतिनिधी २० जुलै



**बुलढाणा** : नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर आपत्ती पूर्व तयारी आणि आपत्कालीन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने बुलढाणा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखड्यानुसार हा निधी खर्च केला जाणार आहे. पूर, अतिवृष्टी, वीज पडणे, वादळ, आग, भूकंप, आदी नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना, आपत्कालीन प्रतिसाद क्षमता वाढविणे, बचाव साहित्याची उपलब्धता प्रशिक्षण जनजागती आणि विविध विभागांमधील समन्वय यासाठी या निधीचा वापर केला जाणार आहे. शासनाने निधी खर्चासाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी हे नियंत्रण अधिकारी, तर निवासी उपजिल्हाधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. निधीचा वापर शासनाने निश्चित केलेल्या मानक कार्यपद्धती नुसार करणे बंधनकारक राहणार असून, खर्चाची माहिती एनडीएमआयएस पोर्टल वर नियमित नोंदवावी लागणार आहे. तसेच निधीचा विनियोग, उपयोगिता प्रमाणपत्र आणि लेखापरीक्षण अहवाल निर्धारित मुदतीत शासनाकडे सादर करणेही आवश्यक राहणार आहे. जिल्ह्यात दरवर्षी अतिवृष्टी, पूर, वीज पडणे आणि इतर नैसर्गिक आपत्तींच्या घटना घडत असतात. या निधीमुळे आपत्ती पूर्व तयारी अधिक प्रथम होण्यास मदत होईल.

# मलकापुर चां बाबा बर्फानी ग्रुप अमरनाथ यात्रेला रवाना



प्रतिनिधी २० जुलै

**मलकापुर** : "भुके को अन्न प्यासे को पाणी जय बाबा बर्फानी" च्या जयघोषात मलकापुर येथील बाबा बर्फानी ग्रुप अमरनाथ यात्रेसाठी आज रात्री रवाना झाला मलकापुर येथील नवयुवक सालाबादप्रमाणे यंदाही अमरनाथ यात्रेला मलकापुर बसस्थानक येथील जागृत हनुमान मंदिर येथून छत्रपती शिवाजी नगर स्थित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून मोठ्या उत्साहात यात्रेला प्रारंभ केला यात्रेदरम्यान तीन राज्यातील प्रमुख देवस्थानचे दर्शन जसे पंजाब येथील अमृतसर येथील जगप्रसिद्ध सुवर्ण मंदिर, अंबा टेम्पल,वाघा बॉर्डर अटारी तिथून हिमाचल प्रदेश येथील नैना देवी, चिंतपूर्णी माता, ज्वाला माता, कांगडा देवी, वलखंड बगलामुखी, चामुंडा देवी करून जम्मू काश्मीर येथील माता वैष्णोदेवी, शिवखोरी करून बाबा अमरनाथ दर्शन घेऊन यात्रा मलकापुर येथे समारोप करते यात्रेला जाणाऱ्यांमध्ये गजानन देशमाने, अनिल हुंबे, सूर्यकांत उंबरकर, नरेंद्र तिवारी, उमेश कोल्हे, गोपाल गाडेकर, राहुल सणांसे, सुनील खिरोळकर, प्रवीण बारिंगे, राहुल बगाडे, रोहित ठोसर, प्रथमेश व्यवहारे, सुपेश बोंबटकार, कृष्णा वैतकर, योगेश राजपूत, अक्षय शिंदे, कार्तिक हुंबे, गोपाल गोरले, अमोल हरमकर , मंगेश अमराळे, तेजस चव्हाण हे आहेत

# आरोपींच्या शोधार्थ जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची पाच पथके रवाना

## चाकू-विळ्याचा धाक दाखवत विवाहितेवर अत्याचार प्रकरण

प्रतिनिधी २० जुलै

**खामगाव:** निवडणूक विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या एसआयआर मोयादी अद्ययावत व अचूक करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची मानली जात असून, प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

आरोपींच्या शोधार्थ जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची पाच पथके रवाना मलकापुर : तालुक्यातील दुधलगाव परिसरात अत्यंत संतापजनक घटना घडली असून, दोन अज्ञात आरोपींनी एका दाम्पत्याच्या घरात घुसून चाकू व विळ्याचा धाक दाखवत लुटमार केली. त्यानंतर पतीला जीवे मारण्याची धमकी देत विवाहितेला शेतात नेऊन दोघांनी आळीपाळीने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना १७ जुलै रोजी रात्री घडली. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडिता ही आपल्या पतीसोबत दुधलगाव येथील शेतातील घरात झोपलेली असताना रात्री ११ च्या सुमारास दोन अज्ञात इसमांनी घराचा दरवाजा तोडून प्रवेश केला. आरोपींपैकी एकाच्या हातात चाकू तर दुसऱ्याच्या हातात विळा होता.

दोघांनी दाम्पत्याला शस्त्रांचा धाक दाखवत पतीजवळील रेडमी 5G कंपनीचा मोबाईल आणि रोख 600 रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले. यानंतर आरोपींनी सोन्या-चांदीचे दागिने मागितले. दागिने नसल्याचे सांगितल्यावर त्यांनी दाम्पत्याला जबरदस्तीने जवळील शेतात नेले. तेथे पतीला विळ्याचा धाक दाखवून आरोपींनी विवाहितेवर आळीपाळीने बळजबरीने बलात्कार केला. घटना घडल्यानंतर आरोपी मोटारसायकलवरून पसार झाले.

घटनास्थळी जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे, सहाय्यक पोलीस अधीक्षक जगताप, फिंगरप्रिंट तज्ञ, श्वान पथक,फॉरेंन्सिक टीम दाखल झाले असून जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली एल.सी.बी, मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशन, शहर पोलीस स्टेशन, दसरखेड एमआयडीसी पोलीस स्टेशन या तिन्ही पोलीस स्टेशनचे वेगवेगळे पाच पथके आरोपींच्या शोधार्थ रवाना झाले असून या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सतीश महल्ले करीत आहेत.

# 'म्युल बँक खाते' प्रकरण; खामगावात सहा जणांची फसवणूक

## सहा जणांची आर्थिक फसवणूक झाल्याचे उघड

प्रतिनिधी २० जुलै

**खामगाव:** सायबर फ स व णु की सा ठी वापरण्यात आलेल्या संशयित 'म्युल बँक खाते' प्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी आयसीआयसीआय बँकेच्या एका खातेधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या खात्याच्या माध्यमातून सहा जणांची एकूण १ लाख ७९ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहर पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस अंमलदार श्रीकृष्ण देवराव हद्दे (३६) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. आयसीआयसीआय बँक, सिसोदिया भवन, नटराज गार्डन जवळीलशाखेतीलएकाखात्याचा वापर सायबर फसवणुकी साठी करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.१० मार्च ते २७ मार्च २०२६ या कालावधीत संबंधित खात्या द्वारे फिर्यादी सह आणखी पाच खातेदारांची एकूण १ लाख ७९ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार खामगावशहरपोलिसांनीभारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक गर्गोंडाणे करीत आहेत. पोलिसांकडून संबंधित खाते धारकाची भूमिका तसेच फसवणुकीमागीलसायबररॅकेटचा शोधघेण्याचेकामसुरूआहे.

# सायबर सुरक्षा, गेमिंगद्वारे होणाऱ्या रॅडिकलायझेशनबाबत जनजागृती

## शेगाव येथील कलामाई इंग्लिश स्कूलमध्ये रेल्वे पोलिसांचा उपक्रम

प्रतिनिधी २० जुलै




**शेगाव:** शहरातील कलामाई इंग्लिश स्कूल येथे १६ जुलै रोजी रेल्वे पोलिस ठाणे, शेगाव यांच्या वतीने सायबर सुरक्षा जनजागृती तसेच ऑनलाइन गेमिंगच्या माध्यमातून होणाऱ्या रॅडिकलायझेशन संदर्भात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यातआले.

कार्यक्रमामध्ये रेल्वे पोलिस ठाणे शेगाव येथील प्रभारी अधिकारी विवेकानंद राळेभात यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून देत सोशल मीडिया, फिशिंग, ओटीपी फसवणूक, बनावट लिंक, डिजिटल अटक, सायबर ब्लॅकमेलिंग, ऑनलाइन आर्थिक फसवणूक तसेच सोशल मीडियावरील अफवा आणि चुकीच्या माहितीपासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. कोणत्याही सायबर गुन्ह्याची त्वरित नोंद करून सायबर हेल्पलाइन १९३० व राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यानंतर पोलिस हवालदार किरण आघाव यांनी ऑनलाइन गेमिंगच्या माध्यमातून होणाऱ्या रॅडिकलायझेशन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन गेम खेळताना अनोळखी व्यक्तींशी होणारा संपर्क, गेमिंग चॅटद्वारे वैचारिक प्रभाव टाकण्याचे प्रयत्न, हिंसक व समाजविघातक विचारसरणीकडे आकर्षित करण्याच्या पद्धती, वैयक्तिक माहितीची मागणी, संशयास्पद लिंक किंवा टास्क देणे यांसारख्या बाबींची माहिती देऊनविद्यार्थ्यांनासतर्कराहण्याचे आवाहनकरण्यातआले.

अशा प्रकारच्या संशयास्पद ऑनलाइन हालचाली दिसून आल्यास त्वरित पालक, शिक्षक किंवा पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.सदर कार्यक्रमास कलामाई इंग्लिश मीडियमस्कूलच्यामुख्याध्यापिका ढोरे, सर्व शिक्षकवृंद तसेच सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थी व शिक्षकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबत माहिती जाणून घेतली. या कार्यक्रमास रेल्वे पोलिस ठाणे, शेगाव येथील पोलिस हवालदार किरण आघाव, पोलिस शिपाई ऋषिकेश जवकर तसेच पोलिस शिपाई बबन शिरसाट उपस्थित होते.

# एस.टी प्रशासनाने भाडेवाढ लागू करु नये

## जिल्हा प्रवासी सेवा संघाची मागणी

प्रतिनिधी २० जुलै

**मलकापुर:** महागाईने आधीच सर्व सामान्य प्रवाशांचे आर्थिक गणित विस्कटले असताना एसटी प्रशासनाने १३.५६झ् भाडेवाढ लागू करू नये अशी मागणी जिल्हा प्रवासी (सेवा) संघाचे अध्यक्ष ॲड.महेंद्रकुमार बुरड यांनी एसटी महामंडळाकडे केली आहे.

याबाबत राज्य परिवहन महामंडळ महामंडळाने प्रवाशांना दि. १७ जुलै च्या मध्यरात्रीपासून १३.५६झ् भाडेवाढ केली आहे.सुधारीत दरही पाच रुपयांच्या पटीत असून सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसणार आहे एसटी ही ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सर्वात स्वस्त आणि विश्वासार्ह सार्वजनिक व्यवस्था मानली जाते विद्यार्थी नोकरदार शेतकरी आणि व्यवसायिक मोठ्या प्रमाणावर एसटीवर अवलंबून आहेत भाडेवाडीचा परिणाम सर्वाधिक दैनिक प्रवाशांवर होणार असून मासिक प्रवासीही खर्चात वाढ होणार आहे सर्वसामान्य जनतेचा विचार करून एसटी महामंडळ प्रशासनाने सदर भाडेवाढ मागे घ्यावी असे आवाहन एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे जिल्हा प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष ॲड. महेंद्रकुमार बुरड यांनी केले आहे.

# नीलगायींच्या हैदोसामुळे पिके धोक्यात

## खंडामुळे चिखली तालुक्यातील शेतकरी दुहेरी संकटात;भरपाईची मागणी

प्रतिनिधी २० जुलै



**चिखली:** यंदाच्या खरीप हंगामात सुमारे दहा दिवस उशिराने झालेली पेरणी चिखली तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरत आहे. त्यातच पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त असताना निलगायींचे कळप शेतातील कोवळी पिके फस्त करत असल्याने दुहेरी संकट निर्माण झाले आहे.

पावसाला उशिरा सुरुवात झाल्याने तालुक्यात २२ जूननंतर खरीप पेरणीला सुरुवात झाली. मात्र, त्यानंतर दररोज पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे पेरणीच्या कामात वारंवार अडथळे निर्माण झाले. परिणामी अनेक शेतकऱ्यांची पेरणी टप्प्याटप्प्याने पूर्ण झाली. पहिल्या टप्प्यात पेरणी झालेली पिके सद्य:स्थितीत कोळपणीच्या अवस्थेत आहेत, तर दुसऱ्या टप्प्यातील पिके नुकतीच उगवण्यास सुरुवात झाली असतानाच पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे या पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. उशिरा झालेली पेरणी आणि त्यानंतरचा पावसाचा खंड यामुळे खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

शेतकऱ्यांना पिके वाचवण्याची चिंता भेडसावत असतानाच विविध भागात नीलगायींच्या कळपांनी उभ्या पिकांमध्ये मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे. सोयाबीन, तूर, मूग, उडीद तसेच इतर खरीप पिके नीलगायी फस्त करत असून, पायांखाली तुडवून मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. दिवस - रात्र शेतात पहारा देऊन नीलगायींना पिटाळून लावण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. रोही शेतातून हाकलण्यासाठी अनेक शेतकऱ्यांना मजूर ठेवावे लागत आहेत. आधीच शेतीच्या कामासाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे.

# नांदुर्यात एसटी वाहकाला मारहाण

प्रतिनिधी २० जुलै

**नांदुरा** : जुन्या बसस्थानकात बसमधील प्रवाशांना लवकर उतरण्याची सूचना केल्याचा राग मनात धरून एसटी महामंडळाच्या वाहकाला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना नांदुरा येथे घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध नांदुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद भास्कर कोळी (वय ४०) हे एसटी महामंडळात वाहक म्हणून कार्यरत असून, अकोला-चोपडा मार्गावरील एमएच-४९-बीझेड-८७९८ या बसमध्ये चालक जितेंद्र पंढरीनाथ पाटील यांच्यासह कर्तव्य बजावत होते. बस खामगावहून नांदुरा कडे येत असताना आरोपी किशोर भास्कर गवई (रा. अटाळी, ता. खामगाव) व त्यांची पत्नी बसने प्रवास करत होते. दुपारी सुमारे ३:२० वाजता बस नांदुऱ्यातील जुन्या बसस्थानकात पोहोचल्यानंतर वाहकाने 'लवकर खाली उतरा, वाहतूक कोंडी होत आहे,' अशी सूचना केली. याचा राग आल्याने किशोर गवई, त्यांची पत्नी व एका अनोळखी व्यक्तीने वाहकाशी वाद घालत शिवीगाळ केली.

त्यानंतर तिघांनी मिळून वाहकाला मारहाण केल्याची तक्रार विनोद कोळी यांनी दिली. या प्रकरणी नांदुरा पोलिसांनी किशोर भास्कर गवई, त्यांची पत्नी व एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१ (१) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल सोळंके करीत आहेत.

# गो. से. महाविद्यालय, खामगाव येथे करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसद 2026-27 ची स्थापना

प्रतिनिधी २० जुलै

**खामगाव** : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी करिअर संसद स्थापन करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, लोकशाही मूल्ये, संघटन कौशल्य आणि सामाजिक उत्तरदायित्व विकसित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो. करिअर संसदेची स्थापना दि. 26 जून 2026 रोजी लोकशाही पद्धतीने पार पडली.

या प्रक्रियेसाठी प्रथम विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले असून 75 विद्यार्थ्यांनी विविध पदांसाठी नोंदणी केली. त्यानंतर सर्व इच्छुक विद्यार्थ्यांना विविध पदांची जबाबदारी, कार्यपद्धती आणि संसदेचे उद्दिष्ट याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पुढील टप्प्यात ऑनलाइन व ऑफलाइन मतदानाद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीच्या उमेदवारांना मतदान करून प्रतिनिधींची निवड केली. मुख्यमंत्री पदासाठी धनराज अहिर, दीक्षा खोडे, संजीवन संजय आगलावे आणि मुक्ता भोजने यांच्यात चुरशीची लढत झाली. मतदानाच्या निकालानुसार संजीवन संजय आगलावे यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण निवड प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. तसेच करिअर कट्टा महाविद्यालय समन्वयक प्रा. अक्षय सिडाम व प्रा. संदीप शिंदे यांनी निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

### करिअर संसद 2026-27 ची पदाधिकारी यादी पुढीलप्रमाणे आहे

मुख्यमंत्री : संजीवन संजय आगलावे, नियोजन मंत्री : नैना परमेश्वर प्रधान, कायदे व शिस्तपालन मंत्री : सलोनी शिंदे, सामान्य प्रशासन मंत्री : वैष्णवी विठ्ठल चटारे, माहिती व प्रसारण मंत्री : धनराज अहिर, उद्योजकता विकास मंत्री : अंकित शिवाजी खोंड, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री : मुक्ता भोजने, कौशल्य विकास मंत्री : स्वप्निल ताकोते, संसदीय कामकाज मंत्री : नम्रता निलजे, महिला व बालकल्याण मंत्री : दीक्षा खोडे, सदस्य : संध्या लोखंडकार, सदस्य : श्रद्धा पुराणिक, सदस्य : अभिषेक तायडे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास, उद्योजकता आणि रोजगाराभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी नवनिर्वाचित करिअर संसदेचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. अशी माहिती महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २० जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# शहरात मतदार आणि बीएलओं मध्ये लपंडाव सुरु

## प्रशासनाच्या अजब नियोजनाने अनेकांना नाही मिळाले इम्युनरेशन फॉर्म

प्रतिनिधी 20 जुलै

अकोला: शहरात सध्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे काम सुरू आहे परंतु प्रशासनाच्या अजब नियोजनाने अनेकांना अद्यापही इम्युनरेशन फॉर्म न मिळाल्याने अनेकांची धावपळ सुरू आहे.

मतदार याद्या भागनिहाय तोडल्याने एकाच कुटुंबातील सदस्यांना तीन ते चार वेगवेगळ्या बीएलओं शी संपर्क करावा लागत आहे तर दुसरीकडे हजारो मतदारांना अद्याप आपल्या बीएलओं चा चेहराही पाहायला मिळालेला नाही तर दुसरीकडे अनेक बीएलओं ना मतदारांची घरे सापडत नसल्याच्या तक्रारी येत आहेत.त्यामुळे मतदारांना आपले कामधंदे सोडून बीएलओं ना शोधण्यासाठी इतरत्र भटकने भाग पडत आहे.



### नाव सापडले तर ठीक नाहीतर जा थेट जिल्हाधिकारी कार्यालयात

प्रभाग निहाय मतदार यादीनुसार मतदारांकडून इम्युनरेशन फॉर्म भरून घेणे बीएलओंचे काम आहे परंतु प्रत्यक्षात मतदार याद्यांची विभागणी करताना भौगोलिक सीमा घरे आणि वस्त्यांचा कोणताही व्यावहारिक विचार करण्यात आलेला नाही परिणामी मतदार जेव्हा बीएलओंशी संपर्क साधतात तेव्हा तुमचे आधार कार्ड फोटो पाठवा नाव सापडले तर अपडेट करू नाहीतर थेट जिल्हाधिकारी कार्यालयात जा अशी उत्तरे नागरिकांना मिळत आहेत तर दुसरीकडे मतदार यादीतील मतदारच सापडत नसल्याने बीएलओ सुद्धा पुरते त्रस्त झाले आहेत दुहेरी कोंडीमुळे या मोहिमेचा पुरता फज्ज़ा उडाल्याचे दिसत आहे.

### बीएलओ घरी येण्याची वाट पाहून मतदार थकले

नियमानुसार बीएलओं नी मतदारांच्या घरोघरी जाऊन ही पडताळणी करणे आवश्यक आहे परंतु प्रत्यक्षात मात्र अनेक बीएलओ हे स्थानिक मंदिरे मतदान केंद्रे किंवा परिसरातील थेट नगरसेवकांच्या कार्यालय मध्ये ठिय्या मांडून बसल्याचे चित्र आहे आपला बीएलओ नक्की कुठे बसला आहे याची कोणतीही अधिकृत माहिती मतदारांपर्यंत पोहोचत नसल्याने सामान्य नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे मतदारांमध्ये तीव्र चिंता आणि संताप व्यक्त होत आहे

# व्रत वैकल्याच्या महिन्यात उपवास करणाऱ्यांचे वांदे



## महागाईमुळे उपवास धरने झाले महाग

प्रतिनिधी 20 जुलै

अकोला: येणारी आषाढी एकादशी तसेच श्रावण महिन्यातील उपवासामुळे उपवासासाठी लागणाऱ्या साहित्याचे दर गगनाला भिडल्याने उपवास धरण्याआधीच उपवास करणाऱ्यांच्या तोंडाचे पाणी पळाले आहे. महागाईमुळे उपवासाचे पदार्थही सर्वसामान्यांच्या बजेट बाहेर जाऊ लागले आहेत उपवासासाठी प्रामुख्याने वापरली जाणारी भगर आणि इतर फराळाच्या साहित्यांचे दर वाढल्यामुळे उपवास करणे ही महाग झाले आहे



### सर्वात जास्त भाव खात आहे भगर

सद्या बाजारात भगरीच्या दरात मोठी वाढ झाली आहे बाजारात पूर्वी 120 रुपये प्रति किलो मिळणारी भगर आता थेट दोनशे रुपये प्रति किलो वर पोहोचली आहे आणि सणासुदीच्या आणि उपवासाच्या दिवसात भगर च्या किमती तब्बल 80 रुपयांनी वाढ झाली आहे त्यामुळे यंदा भगर उपवासाच्या थाळीतून जवळपास गायब राहण्याची शक्यता आहे

### फळांचे भावही वाढले

उपवासाच्या दिवसांमध्ये फळांनाही मोठी मागणी असते बाजारात फळांचे दरही प्रचंड वाढले आहेत सफरचंद दोनशे रुपये किलो केळी 40 ते 50 रुपये डझन डाळिंब 160 ते 200 रुपये किलोवर गेले आहे फळांचे भाव वाढल्यामुळे उपवासाच्या दिवसात फलाहार करणे ही आर्थिक दृष्ट्या कठीण झाले आहे

### आषाढी एकादशीनंतर श्रावण महिन्याचे उपवास

आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरुवात होते ज्यामध्ये श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारचे व्रत आणि इतर उपवासांना विशेष महत्त्व असते लागोपाठ येणाऱ्या या उपवासाच्या पार्श्वभूमीवर बाजारात फराळाचे साहित्य फळे आणि उपवासांच्या इतर वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे त्यामुळे मागणी जास्त आणि पुरवठा कमी असल्याने भगरीचे दर 120 रुपयांवरून थेट दोनशे रुपये किलोवर पोहोचले आहेत

### रेडीमेड फराळाच्या पदार्थांचेही भाव भिडले गगनाला

कच्च्या माला सहित तेल आणि तुपाचे भाव वाढल्याने हॉटेल आणि फरसाण दुकानांमधील उपवासाची खिचडी, वडे, भगर, आमटी, साबुदाणा, चिवडा, यासारख्या रेडिमेड पदार्थांच्या किमतीत मोठी वाढ झाली असून उपवास करणे आणखी खर्चिक झाले आहे.

# कानडी पोस्ट ऑफिसमधील कथित आर्थिक गैरव्यवहार

## महिलांच्या खात्यांतील रक्कम काढल्याचा आरोप खातेदारांना न्याय मिळवून देण्याची मागणी आली समोर

प्रतिनिधी 20 जुलै

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील पिंजर पोलिस स्टेशन अंतर्गत कानडी येथील पोस्ट ऑफिसमध्ये आरडी आणि बचत खातेदार महिलांच्या खात्यांमधील पैशांचा कथित गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. पिंजर पोलिस स्टेशनमध्ये खातेदारांनी तक्रार केली आहे.

खातेदारांच्या तक्रारीनुसार, केवायसी प्रक्रियेच्या नावाखाली महिलांना पोस्ट ऑफिसमध्ये बोलावून त्यांच्या अंगठ्याचे ठसे घेण्यात आले. त्यानंतर संबंधित महिलांच्या खात्यांमधून परस्पर रक्कम काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात अनेक खातेदार प्रभावित झाल्याचा दावा करण्यात येत असून, संतप्त नागरिकांनी पिंजर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार गोरे करीत आहेत. या कथित आर्थिक गैरव्यवहारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, दोषींवर कठोर कारवाई करून नुकसानग्रस्तांना न्याय मिळावा, अशी मागणी होत आहे. मात्र, या आरोपांची सत्यता पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

# निंभोरा बु. येथे विजेचा शॉक लागून युवकाचा मृत्यू

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील निंभोरा बु. येथे गावठाण सेपरेशन फिडरच्या कामादरम्यान विजेचा शॉक लागून तळेगाव येथील शेख समीर शेख जमीर यांच्या मृत्यूनंतर घटनास्थळी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते

मिळालेल्या माहितीनुसार, अशोका बीड कॉन कंपनी मार्फत गावठाण सेपरेशन फिडरचे काम सुरू होते. कामादरम्यान दुसऱ्या लाईनचा विद्युत प्रवाह खांबात आल्याने शेख समीर यांना जोरदार शॉक बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तेल्हारा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, मृताच्या नातेवाईकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली असून संबंधित कंपनी व दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. 'जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह घटनास्थळावरून उचलू देणार नाही,' अशी ठाम भूमिका नातेवाईकांनी घेतली होती. तेल्हारा पोलीस तपास करीत आहेत.

**नातेवाईकांची कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी**

# श्री विठ्ठल मंदिर येथे आषाढी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह चें आयोजन

## सप्ताहभर होणार अखंड धार्मिक कार्यक्रम, भाविकांच्या गर्दीचा ओघ सुरु अखंड हरीनाम सप्ताह चें यंदा ९३ वे वर्ष, भक्तांसाठी अकोल्यात सोय

प्रतिनिधी 20 जुलै

**अकोला :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले जुने शहर स्थित ३२२ वर्ष पुरातन श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह चें आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह बुधवार २२ जुलै ते बुधवार २९ जुलै पर्यंत हे आयोजन असेल.

पुरातन श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिरात होत असलेल्या या सप्ताहमध्ये अखंड प्रहर म्हणजेच वीणावादन, हरिपाठ, भजन, भक्तिसंगीत कार्यक्रम, कीर्तन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी मंदिरात राष्ट्रीय कीर्तनकार, कीर्तन वैजयंती व कीर्तनशारदा या उपाधीने सन्मानित ह. भ. प. डॉ नंदिनीताई कडूस्कर, नागपूर यांचे दररोज रात्री ८ ते १० या वेळी कीर्तन होणार आहे. तसेंच सप्ताहभर विविध भजनी मंडळाची भजनसेवा सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत अखंड असणार असून रोज सायंकाळी ६ ते रात्री ८ पर्यंत भक्तिसंगीताचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे . दिनांक २५ जुलै रोजी अर्थात देवशयनी आषाढी एकादशी च्या दिवशी पहाटे ४ वाजता श्री विठ्ठल रुख्मिणी यांच्या मूर्तीस षोडशोपचार पूजा व अभिषेक मंडळाचे सर्वसेवाधिकारी श्री कृष्णा गोवर्धनजी शर्मा व सौ अर्चना शर्मा यांचे हस्ते करण्यात येणार आहे. आषाढी एकादशी च्या दिवशी मंदिरात भक्तांची अलोट गर्दी होत असते, परिसरात जत्रेचे स्वरूप येते, आपल्या लाडक्या विठुरायाचे रूप डोळ्यात साठवण्यासाठी माता भगिनी व पंचक्रोशी मधील भाविक गर्दी करतात. आषाढ पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी गोपाळकाला, कीर्तन व दहीहंडी चा कार्यक्रम होतं असून सायंकाळी ५ वाजता श्री विठ्ठल रुख्मिणी यांची भव्य शोभयात्रा महानगरमधून निघते. तसेंच शोभयात्रा नंतर महाप्रसादाने या सप्ताहची सांगता करण्यात येते.

# घरगुती कारणातून पिता-पुत्राची आत्महत्या

प्रतिनिधी 20 जुलै

**खामगाव :** तालुक्यातील पारखेड येथे घरगुती कारणातून वडील व मुलाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी सायंकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली असून, ग्रामीण पोलिस आत्महत्येच्या कारणांचा तपास करीत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष हरिश्चंद्र गावंडे (५०) व विठ्ठल संतोष गावंडे (३०) अशी मृतांची नावे आहेत. घटनेची माहिती मिळताच खामगाव ग्रामीण पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी खामगाव येथील सामान्य रुग्णालयात पाठविले. या दुहेरी आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, प्राथमिक माहितीनुसार कारणातून ही घटना घडल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे पारखेड गावात खळबळ उडाली असून, खामगाव ग्रामीण पोलिस पुढील तपास करीत आहेत. वृत्तलिहे पर्यंत पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली नव्हती

# खुनातील आरोपीला दोन वर्षानंतर अटक

## राजापेठ पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी 20 जुलै



अमरावती: दि. 21/08/2024 रोजी रात्री 8.30 ते 9 वाजताच्या सुमारास फिर्यादी आकाश सिताराम रामटेके हा त्याचा मित्र यश रोडगे याच्यासोबत चांडक नास्ता सेंटर, सातूर्णा रोड येथे गेला असता तेथे काटे, श्रेयस आवटे, तक्षदीप इंगळे, मंथन पाळनकर, दिपक ठाकूर व त्यांचे इतर साथीदार हे तीन दुचाकींवर आले. जुन्या वादातून आरोपींनी यश रोडगे याच्यावर तलवार व चाकूने जीवघेणा हल्ला करून गंभीर जखमी केले. फिर्यादी मध्ये पळत असताना त्यालाही तलवारीने दुखापत झाली. त्यानंतर आरोपींनी जखमी यश ला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून घेऊन गेले. पुढे पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींनी यशचा खून करून मृतदेह भातकुली नाका परिसरातील नाल्यात टाकल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्ध तक्रार दिली सदर फिर्यादी वरून पोलीस स्टेशन राजापेठ येथे ४४२/२०२४ ipc ३०२ दाखल होता. सदर गुन्ह्यातील आरोपी शशिकांत काटे वय २१ वर्ष हा मुख्य आरोपी असून तो दोन वर्षापासून फरार होता त्याला आज रोजी कठोरा परिसरातून ताब्यात घेतले असून सदर गुन्ह्यात त्याला अटक करण्यात आली आहे.

# मनपासमोर नगरसेवक नीलेश देव यांचे बेमुदत उपोषण सुरु

## समाजातील विविध घटकांचा वाढता पाठिंबा

प्रतिनिधी 20 जुलै



**अकोला :** प्रभाग क्रमांक ३ तसेच सन २०१६ मध्ये महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या हद्दवाढ भागातील नागरिकांना मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप करत, वंचित बहुजन आघाडीचे गटनेते व नगरसेवक नीलेश देव यांनी आज, २० जुलै रोजी महानगरपालिका मुख्यालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले आहे. गेल्या काही काळापासून प्रभाग क्र. ३ आणि हद्दवाढ भागातील रस्त्यांची दुरवस्था, पाण्याचे संकट, नाल्यांची नियमित स्वच्छता नसणे आणि स्ट्रीटलाईट्सचा अभाव यांसारख्या गंभीर समस्यांमुळे नागरिक त्रस्त आहेत. या मूलभूत सुविधांसाठी प्रशासनाकडे वारंवार लेखी व तोंडी पाठपुरावा करून आणि कायदेशीर नोटिसा देऊनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. अखेर लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी नीलेश देव यांनी हे उपोषणाचे हत्यार उपसले आहे. मच्छिंद्र नगर ते ढोणे महाविद्यालय परिसरातील जलकुंभाच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे.रेल्वे मोऱ्यांची तातडीने स्वच्छता करणे.जठार पेठ, ज्योती नगर, मच्छिंद्र नगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणे.न्यू तापडिया नगरसह हद्दवाढ भागात एलईडी स्ट्रीटलाईट लावणे. पंचशील नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते नागसेन विद्यालय रस्ता, डुंबे वाडी, चैतन्य नगर, दम्माणी परिसर, खरप ले-आऊट, पवन नागरी, निर्मल नगर आदी भागांतील रस्त्यांची कामे आणि मुख्य नाल्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे. समतोल पाणीपुरवठ्यासाठी नियंत्रण झडपा बसवणे, दलित वस्ती सुधारणा निधीचे समान वाटप करणे आणि हद्दवाढ भागासाठी कालबद्ध विकास आराखडा तयार करणे. या मागण्या त्यांनी समोर केल्या आहे. नीलेश देव यांच्या या निर्णायक लढ्याला पहिल्याच दिवशी समाजातील विविध घटकांकडून, स्थानिक नागरिकांकडून आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून मोठा पाठिंबा मिळत आहे. उपोषणस्थळी नागरिकांची गर्दी वाढत असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. आता या तीव्र आंदोलनानंतर महानगरपालिका आयुक्त आणि महापौर या गंभीर परिस्थितीची दखल घेणार का, की नेहमीप्रमाणे नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाणार, याकडे संपूर्ण अकोलेकरांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, जोपर्यंत प्रशासनाकडून मागण्यांवर ठोस व लेखी निर्णय घेतला जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार नीलेश देव यांनी व्यक्त केला आहे. गरज पडल्यास न्यायालय, राज्य शासन व इतर सक्षम प्राधिकरणांकडे दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# विद्यार्थी व युवकांच्या न्यायासाठी राष्ट्रवादीचे धरणे आंदोलन

प्रतिनिधी 20 जुलै



**अकोला:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटातर्फे राज्यातील विद्यार्थी व युवकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यासाठी आज सोमवार 20 जुलै रोजी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे धरणे आंदोलन करण्यात आले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अकोला जिल्हा ग्रामीण व अकोला महानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे व महानगराध्यक्ष मोहम्मद रफीक सिद्दिकी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले राज्यातील स्पर्धा परीक्षांमधील वारंवार होणारी पेपर फुटी भरती प्रक्रियेमधील कठीत गैरव्यवहार ऑनलाइन परीक्षा व्यवस्थित त्रुटी पोलीस भरतीतील अनियमित्ता तसेच विद्यार्थी व युवकांच्या विविध प्रश्नांकडे सरकारकडून होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले विद्यार्थी व युवकांना न्याय मिळावा भरती प्रक्रिया पारदर्शी व्हावी दोषींवर कठोर कारवाई व्हावी तसेच विद्यार्थी व युवकांच्या हिताचे निर्णय तातडीने घेण्यात यावेत या प्रमुख मागण्यांसाठी ही आंदोलन करण्यात आले या आंदोलनात पक्षाचे सर्व पदाधिकारी महिला आघाडी युवक युवती विद्यार्थी कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# भाजी विक्रेत्यांचे वजन काटे मनपाने केले जप्त

प्रतिनिधी 20 जुलै

**अकोला: शहरातील सातव चौक ते जठार पेठ चौकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर भाजी विक्रेत्यांनी रस्त्यावर ठाण मांडल्याने या रस्त्यावर वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली आहे या भाजीविक्रेत्यांना महापालिकेच्या शाळेत बसण्याची जागा उपलब्ध करून दिल्यानंतरही हे विक्रेते रस्त्यावरच आपला व्यवसाय करीत आहेत रस्त्यावर अतिक्रमण वाढल्याने याआधी सुद्धा मोठे अपघात**



**झाले आहेत दररोज या रस्त्यावर ट्रॅफिक जामची स्थिती निर्माण होते. या अतिक्रमण धारकांवर कारवाई केल्यानंतरही रस्त्यावर**



**व्यवसाय करणे हे अतिक्रमण धारक थांबवत नसल्याने आज शेवटी महापालिकेच्या अतिक्रमण पथकाने या भाजीविक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारीत या भाजीविक्रेत्यांचे इलेक्ट्रिक वजन काटे जप्त करण्याची कारवाई केली इलेक्ट्रिक वजन काटे जप्त करण्यासाठी महापालिकेच्या सुरक्षा रक्षकांना या भाजीविक्रेत्यांसोबत झटापट करणे भाग पडले. या कारवाईनंतर अनेक भाजी विक्रेत्यांनी आपले अतिक्रमण स्वतःहून काढण्यास सुरुवात केली होती**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135